


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १६४ * नांदेड * शनिवार, दि. २० जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नांदेड आणि लातूरला लवकरच मिळणार अप्पर आयुक्तालय?

## महसूल आयुक्तालयावर नवा फॉर्म्युला

**नांदेड/ लातूर (प्रतिनिधी)–** महसूल आयुक्तालयावरून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या नांदेडविरुद्ध लातूर या राजकीय आणि प्रशासकीय संघर्षावर तोडगा काढण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येत आहे. नांदेड आणि लातूर या दोन्ही ठिकाणी अप्पर आयुक्तालय स्थापन करण्यात येणार असल्याचा दावा लातूर जिल्ह्यातील भाजप आमदार अभिमन्यू पवार यांनी केला आहे. तसेच या संदर्भात पुढील एक ते दोन महिन्यांत बहुदा १५ ऑगस्ट रोजी घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आमदार पवार यांनी सांगितले की, या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष यांनी स्वतः मला तसेच भाजप नेते माजी मुख्यमंत्री व खासदार अशोक चव्हाण यांनाही या निर्णय प्रक्रियेबाबत माहिती दिली आहे. त्यामुळे महसूल आयुक्तालयाच्या मुद्द्यावर दोन्ही बाजूंना समन्वयातून मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे संकेत त्यांनी दिले.

महसूल आयुक्तालयाच्या मागणीवरून अनेक वर्षांपासून दोन्ही जिल्ह्यांमध्ये राजकीय संघर्ष, जनआंदोलने आणि प्रशासकीय पातळीवरील पाठपुरावा सुरू होता. आता दोन्ही शहरांना अप्पर आयुक्तालयाच्या माध्यमातून प्रशासकीय बळ देण्याचा पर्याय पुढे आला असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण घडामोडींची माहिती भाजप नेते खासदार अशोक चव्हाण यांनाही असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी स्पष्ट केले आहे.




दरम्यान, दोन दिवसांपूर्वीच महसूल आयुक्तालयाच्या मुद्द्यावर भाजप नेते तथा माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी भाजपमध्ये माझी सीनियारिटी आहे, त्यामुळे माझ्या शब्दालाच पक्षात वजन आहे, असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्याकडे राजकीय वर्तुळात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना उद्देशून प्रत्युत्तर म्हणून पाहिले जात आहे. आता अभिमन्यू पवार यांनी मांडलेला अप्पर आयुक्तालयाचा पर्याय आणि पुढील एक-दोन महिन्यांत निर्णय होण्याचा दावा यामुळे महसूल आयुक्तालयाचा दीर्घकाळ सुरू असलेला वाद खरोखरच मिटणार का? याकडे नांदेड आणि लातूरसह मराठवाड्याचे आणि एकूणच संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष असणार आहे.

- १५ ऑगस्टला घोषणेची शक्यता
- भाजप आमदार अभिमन्यू पवार यांचा दावा

**नवीन जिल्हा निर्मितीनंतर...**

आ. पवार यांनी पुढे सांगितले की, भविष्यात नांदेड जिल्ह्यातील किनवट, लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वतंत्र जिल्हे अस्तित्वात आल्यानंतर लातूर आणि नांदेड येथे स्वतंत्र महसूल आयुक्तालय सुरू करण्याचा मार्ग अधिक सुलभ होऊ शकतो. त्यामुळे सध्या अप्पर आयुक्तालयाचा पर्याय हा पुढील प्रशासकीय पुनर्रचनेचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

# मला नेतृत्त्वाची हाव नाही, शिवसेना पक्षप्रमुखपद सोडायला मी तयार -उद्धव ठाकरे

**मुंबई (प्रतिनिधी)–** माझ्या नेतृत्त्वावर होणारे आरोप तुम्हाला खरे वाटत असतील तर मी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडायला या क्षणी तयार आहे. माझ्या जागी एखाद्या सामान्य शिवसैनिकाला त्या पदावर बसवा. मला नेतृत्त्वाची कोणतीही हाव नाही. मी कोणत्याही क्षणी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडायला तयार आहे, असे वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या वर्धापन दिन सोहळ्यात केले.



शुक्रवारी मुंबईतील षणमुखानंद सभागृहात शिवसेना ठाकरे गटाचा ६० वा वर्धापनदिन पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाचा समारोप अत्यंत नाट्यमयरितीने केला. उद्धव ठाकरे यांनी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडण्याची भाषा करताच उपस्थित शिवसैनिकांनी जागेवरुन उठून त्या प्रस्तावाला विरोध केला. उद्धव ठाकरे यांच्या या अनपेक्षित प्रस्तावामुळे आता ठाकरे गटात काही संघटनात्मक बदल होणार का, अशी चर्चा आता रंगू लागली आहे. एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन टायगर' राबवून दुसऱ्यांदा शिवसेना फोडून हा पक्ष खिळखिळा केला आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांची शिवसेना पक्षप्रमुखपद सोडण्याची ही खेळी ठाकरे गटाची नव्याने बांधणी करण्यात आणि पक्षात नवी जान फुंकण्याच्यादृष्टीने गेमचेंजर ठरणार का, हे आता बघावे लागेल.

### तुम्ही आम्हाला काय तुडवणार, हिंमत असेल तर समोर या; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा इशारा

रात्री खासदारांना शिव्या द्यायच्या आणि सकाळी कौतुक करायचं, हे असं चालतं का? सेनापतीने घरात बसून चालत नाही, त्याने पुढे येऊन लढावं लागतं. हा एकनाथ शिंदे लढवय्या आहे, कुणावर संकट आलं तर पुढे मी असेन. हे काय आम्हाला चॅलेंज देणार. आता म्हणतात तुडवा. हिंमत असेल तर समोर या. तुडवायला पाय लागतात, तुम्ही आला तर हे शिवसैनिक तुमचे पाय जागेवर ठेवतील का? असा इशारा शिवसेनेच्या वर्धापन दिन कार्यक्रमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला.

# नांदेडमध्ये नाकाबंदी दरम्यान पोलीस निरीक्षकाच्या अंगावर तीनवेळा गाडी घालण्याचा प्रयत्न

## पाठलाग करून गुन्हेगारांना अटक, २२ जूनपर्यंत पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे हे आपल्या अन्य सहकाऱ्यांसोबत नाकाबंदी दरम्यान वाहन तपासणी करत होते. यावेळी बेशिस्तपणे आपल्या ताब्यातील वाहन चालून एकदा नव्हे, दोनदा नव्हे तर तब्बल तीन वेळेस पोलीस निरीक्षकांच्या अंगावरून गाडी घालण्याचा प्रयत्न केला. एवढेच नाही तर दोन कर्मचाऱ्यांना यात दुखापत झाली आहे. याप्रकरणी भाग्यनगर आणि वजिराबाद पोलिसांनी पाठलाग केल्यानंतर तिघांना अटक केली आहे. या तिन्ही गुन्हेगारांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना २२ जूनपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे.

शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून रात्री वाहनांची तपासणी सुरू होती. दि. १८ जूनच्या रात्री सुमारे ११.४५ ते १९ जूनच्या १२.१५ दरम्यान वाहन तपासणी सुरू असताना (एमएच-२६-सीव्ही-९८९८) क्रमांकाची हॅरियर कंपनीची कार तेथे आली. पोलिसांनी वाहनाची तपासणी करण्यासाठी इशारा दिल्यानंतर वाहनातील युवक तेथून निघून गेले. मात्र काही वेळाने ते पुन्हा घटनास्थळी आले आणि त्यांनी वाहन पोलिसांच्या दिशेने नेल्याचा आरोप आहे. या कृतीमुळे कर्तव्य बजावत असलेल्या पोलिसांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला होता.

या प्रकरणात तरणजित सिंघ अमरिकसिंग बल (वय १८), अमरिंदरसिंघ कुलप्रतापसिंघ कपूर (वय १९) आणि हर्षदीपसिंघ नरेंदरसिंघ सुखई (वय १९) या तिघांना वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अटक करण्यात आली आहे.

तपासादरम्यान आणखी काही बाबींचा उलगडा होण्याची शक्यता असल्याने पोलीस कोठडी आवश्यक असल्याचा युक्तिवाद सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. जी. महाजन यांनी न्यायालयात केला. तो ग्राह्य धरत न्यायालयाने तिघांना २२ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या घटनेतील एक आरोपी परविंदरसिंघ उर्फ अंगद बसंतसिंघ नेहंग हा फरार आहे. पोलिसांवर हल्ला करणे किंवा त्यांच्या कामात अडथळा निर्माण करणे हा गंभीर गुन्हा असून युवकांनी कायद्याचा सन्मान राखत जबाबदार नागरिक म्हणून वागण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# येत्या २४ ते २५ जूनपासून राज्यात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात मान्सूनने ब्रेक घेतला असून येत्या २४ ते २५ जूनपासून पुन्हा मान्सून सक्रीय होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे.

यंदा केरळमध्ये उशिराने दाखल झालेल्या मान्सूनने ६ जून रोजी तळकोकणात प्रवेश केला. त्यानंतर ८ जून रोजी रत्नागिरीतील हर्णे, सातारा आणि सोलापूर परिसरापर्यंत मान्सूनची मजल पोहोचली. त्यामुळे राज्यभरात लवकरच मान्सून सक्रिय होईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, त्यानंतर मान्सूनची प्रगती जवळपास ठप्प झाली असून, महाराष्ट्रातील अनेक भाग अद्याप जोरदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. हवामान तज्ज्ञांच्या मते, प्रशांत महासागरातील एल निनोला पोषक ठरणारी परिस्थिती आणि पश्चिमी जेट स्ट्रीम नेहमीपेक्षा अधिक दक्षिणेकडे सरकल्याने मान्सूनला गती देणाऱ्या वाऱ्यांवर परिणाम झाला. त्यामुळे मान्सूनचा वेग मंदावला आणि त्याची प्रगती थांबली.

८ जून रोजी दक्षिण कोकण आणि लगतच्या दक्षिण मध्य महाराष्ट्रात मान्सून दाखल झाला होता. साधारणपणे १० ते १५ जूनदरम्यान राज्याच्या बहुतांश भागात पावसाला सुरुवात होणे अपेक्षित होते. मात्र, १८ जूनपर्यंत मान्सून कोकण पट्ट्यातच रेंगाळल्याचे चित्र दिसून आले. आता भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २४ ते २५ जूनपासून महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे.

# राज्यात १५ ऑगस्टनंतर अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांवर होणार कारवाई

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात १ जून ते १५ ऑगस्ट २०२६ या अडीच महिन्यांच्या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या मुदतीनंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर आरटीओ आणि परिवहन विभागाकडून कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

या संस्थांमार्फतच राज्यातील सर्व अमराठी चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच या संस्थांकडून मिळणारे अधिकृत प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून कायदेशीर कारवाईच्या वेळी ग्राह्य धरले जाईल. परिवहन विभागाचे सहआयुक्त रवी गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात या प्रशिक्षण वर्गांना मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली आहे.

# नांदेडसह सर्वच विधान परिषदेत महायुतीचे उमेदवार विजयी होतील -खा. अशोक चव्हाण

## अमरनाथ राजूरकर प्रचंड मताधिक्याने निवडून येतील

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान झाले. मतदानामध्ये मोठ्या फरकाने महायुतीचे अमरनाथ राजूरकर यांच्या बाजूने मतदान झाल्याचे दिसत आहे. कारण आमच्याकडे बहुमत असल्याने मोठ्या फरकाने अमरनाथ राजूरकर विजय होतीलच यात तीळमात्र शंका नसून राज्यातील सर्वच विधान परिषदेचे उमेदवार हे महायुतीचेच विजयी होतील, असा विश्वास राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.



नांदेड विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान पार पडले. त्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांशी खा. अशोक चव्हाण संवाद साधत होते. ते म्हणाले की, महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांना किती मत पडणार, याचे भाकीत सांगणारा मी काही भविष्यवेत्ता नाही. परंतु ते मोठ्या मताधिक्यांनी निवडून येतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

महसूल आयुक्तालय नांदेडऐवजी लातूरला नेण्याच्या चर्चेवर बोलताना ते म्हणाले की, मला याची अधिकृत माहिती नसली तरी लातूरचे सहकारी आमदार तोडगा काढण्याच्या भूमिकेत असून आम्हीही त्यांना प्रतिसाद देऊ. तसेच शिवसेना ठाकरे गटातील खासदार फुटीबद्दल बोलताना ते म्हणाले की, शिवसेना वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. पक्षातील अंतर्गत मतभेद उफाळून आल्यामुळेच आमदार आणि खासदार दूर जात असल्याचा टोला त्यांनी लगावला.

पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींविषयी बोलताना ते म्हणाले, एका विशिष्ट राजकीय परिस्थितीत हे घडत आहे. विरोधी म्हणून त्या खासदार, आमदारांना जनतेने निवडून दिले आहे, हे जरी खरे असले तरी त्याचे सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम काय होतील, हे ३ वर्षांनंतर जनता ठरवेल, अशी प्रतिक्रिया खा. अशोकराव चव्हाण यांनी दिली.

# नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर प्रवासी गाड्यांना अतिरिक्त सर्वसाधारण डबा जोडण्याचा निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)–** रविवार, दि. २१ जून रोजी होणाऱ्या नीट परीक्षेसाठी प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची तसेच इतर प्रवाशांची संभाव्य वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने काही निवडक प्रवासी गाड्यांना एक अतिरिक्त सर्वसाधारण (जनरल) डबा जोडण्याचा निर्णय घेतला आहे.




या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांपर्यंत अधिक सोयीस्कर व आरामदायी प्रवास करता येणार असून प्रवाशांच्या वाढीव मागणीची पूर्तता होण्यास मदत होईल. गाडी क्र. ५७६५१ नांदेड- मनमाड दि. २० जून रोजी, गाडी क्र. ५७६५२ मनमाड- नांदेड दि. २१ जून रोजी, गाडी क्र. ५७६५३ पूर्णा- आदिलाबाद दि. २० व २१ जून रोजी, गाडी क्र. ५७६५४ आदिलाबाद- परळी वैजनाथ दि. २१ व २२ जून रोजी, गाडी क्र. ५७६५५ परळी वैजनाथ- अकोला दि. २१ व २२ जून २०२६ गाडी क्र. ५७६५६ अकोला- पूर्णा दि. २२ व २३ जून रोजी या गाड्यांना एक अतिरिक्त सर्वसाधारण (जनरल) डबा जोडण्यात येणार आहे.

नांदेड विभाग, दक्षिण मध्य रेल्वे प्रवाशांना सुरक्षित, सुलभ व आरामदायी प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. नीट परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांना आणि प्रवाशांना अधिक चांगली सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशाने अतिरिक्त डबे जोडण्याचा हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी छापील पास बंद


**मुंबई (प्रतिनिधी)–** येत्या सोमवारपासून (२२ जून) सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी विधान भवन प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या वेळी विधान भवनात प्रवेश करण्यासाठी वापरले जाणारे पारंपारिक छापील पासेस पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. त्याऐवजी पीठासीन अधिकाऱ्यांपासून ते मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, अधिकारी, कर्मचारी, स्वीय सहायक आणि अभ्यागत अशा सर्वांनाच आता 'ई-प्रवेश प्रणाली'अंतर्गत चेहरा पडताळणी पद्धतीद्वारेच प्रवेश दिला जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे देण्यात आली.




# लखनऊमध्ये नीट परीक्षार्थीची आत्महत्या

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट-युजी परीक्षेची तयारी करणाऱ्या आणखी एका विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. लखनऊ येथील सुहानी यादव या १७ वर्षांच्या मुलीने राहत्या घरी आत्महत्या केली.

२१ जून रोजी होणाऱ्या नीट पुनर्परीक्षेपूर्वी १६ जून रोजी म्हणजेच मंगळवारी तिने हे टोकाचे पाऊल उचलले. सुहानीचा मृतदेह तिच्या राहत्या घरी पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. तिने मृत्यूपूर्वी कोणतीही सुसाईड नोट लिहून ठेवल्याचे आढळले नसल्याचे बाझार खाला पोलीस स्टेशनचे अधिकारी ब्रिजेश सिंह यांनी सांगितले.






जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# पॅनिक बटण : आणखी एक कागदी घोडा?

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून प्रवास करणाऱ्या महिला, मुली आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न देशात अनेक वर्षांपासून गंभीर बनला आहे. टॅक्सी, ऑटो, बस यांसारख्या वाहनांमध्ये होणारे अत्याचार, छेडछाड आणि गुन्ह्यांच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक वाहतूक वाहनांमध्ये 'व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस' (व्हीएलटीडी) अर्थात वाहनाचे स्थान दाखवणारी यंत्रणा आणि 'पॅनिक बटण' बसविणे सक्तीचे करण्याचा दिलेला निर्णय निश्चितच महत्त्वपूर्ण आणि स्वागतार्ह आहे. मात्र, प्रश्न केवळ नियम बनविण्याचा नाही; तर त्याची प्रभावी अंमलबजावणी होणार का, हा आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश देत नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनांना फिटनेस प्रमाणपत्र किंवा परमिट देऊ नये, असे म्हटले आहे. संकटसमयी पॅनिक बटण दाबल्यास पोलीस नियंत्रण कक्षाला तत्काळ माहिती जाईल आणि जीपीएसच्या मदतीने वाहनाचे अचूक ठिकाण समजू शकेल. तत्त्वतः ही यंत्रणा महिलांच्या सुरक्षेसाठी 'गेमचेंजर' ठरू शकते. परंतु भारतातील वास्तव वेगळे सांगते. देशातील बहुतांश शहरांमध्ये खाजगी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही नियमबाह्य पद्धतीने चालते, हे वास्तव कुणी नाकारू शकत नाही. आरटीओचे नियम धाब्यावर बसवून दिवाळी आणि उन्हाळी सुट्ट्यांमध्ये वारेमाप भाडेवाढ करणारे लोक हे खाजगी प्रवासी वाहकच आहेत. यांच्याकडे योग्य ती कागदपत्रे नसतात. अनेक वेळा चालक देखील प्रशिक्षित नसतात. तरीही आरटीओचे अर्थपट्टीने डोळे बंदच असतात. तसेच टॅक्सी चालकांकडे आवश्यक कागदपत्रे नसतात. फिटनेस नसलेली वाहने रस्त्यावर धावत असतात. मीटरप्रमाणे भाडे न घेणे, प्रवाशांशी उद्धट वर्तन, वाहतूक नियमांचे उल्लंघन या गोष्टी रोजच्या झाल्या आहेत. अशा परिस्थितीत पॅनिक बटण आणि ट्रॅकिंग यंत्रणा बसविण्याचा नियम कितपत काटेकोरपणे पाळला जाईल, याबद्दल शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. विशेषतः प्रादेशिक परिवहन कार्यालये (आरटीओ) आणि खाजगी वाहन व्यवसाय यांच्यातील आर्थिक संबंध हा मोठा प्रश्न आहे. अनेकदा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना संरक्षण दिले जाते, असा सर्वसामान्यांचा अनुभव आहे. पैसे देऊन फिटनेस प्रमाणपत्र मिळविणे, कागदपत्रांची पूर्तता न करताही परमिट मिळणे किंवा तपासणी मोहिमा केवळ दिखाव्यापुरत्या मर्यादित राहणे, या गोष्टी नवीन नाहीत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश कितीही कठोर असले तरी प्रत्यक्षात ते कागदावरच राहण्याची भीती व्यक्त होत आहे. सरकार आणि प्रशासनाची मोठी समस्या म्हणजे नियमांची निवडक अंमलबजावणी. एखादा मोठा अपघात किंवा गुन्हा घडल्यानंतर काही दिवस मोहीम राबवली जाते; परंतु नंतर परिस्थिती पुन्हा जैसे थे होते. हेल्मेट सक्ती, सीटबेल्ट नियम, अवैध प्रवासी वाहतूक किंवा ओव्हरलोडिंगविरोधातील कारवाया याची अनेक उदाहरणे आहेत. सुरुवातीला गाजावाजा होतो, परंतु कालांतराने नियमांचे पालन ढिले पडते. पॅनिक बटणाच्या बाबतीतही असेच होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामध्ये तांत्रिक अडचणी देखील कमी नाहीत. अनेक वाहनचालकांना आधुनिक उपकरणांची माहिती नसते. ग्रामीण आणि निमशहरी भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी, नेटवर्क समस्या आणि उपकरणांच्या देखभालीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. अनेक चालक अतिरिक्त खर्च टाळण्यासाठी बनावट किंवा निकृष्ट दर्जाची उपकरणे बसवू शकतात. त्यांची तपासणी कोण करणार, हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न केवळ तंत्रज्ञानाने सुटणारा नाही. त्यासाठी प्रशासनाची इच्छाशक्ती, पोलिसांची तत्परता आणि भ्रष्टाचारमुक्त यंत्रणा आवश्यक आहे. पॅनिक बटण दाबल्यानंतर पोलीस वेळेत पोहोचले नाहीत, तर त्या यंत्रणेचा उपयोग काय? नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार का? खोटे अलर्ट आल्यास त्याचे व्यवस्थापन कसे होणार? या अनेक प्रश्नांची उत्तरे अजून स्पष्ट नाहीत. याशिवाय प्रवाशांमध्येही जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. अनेकांना पॅनिक बटण म्हणजे काय, ते कसे वापरायचे, याची माहितीही नसेल. त्यामुळे केवळ आदेश देऊन जबाबदारी संपत नाही. व्यापक जनजागृती, नियमित तपासणी आणि दोषींवर कठोर कारवाई ही त्रिसूत्री आवश्यक ठरणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय निश्चितच योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर उपाययोजना होणे ही काळाची गरज आहे. मात्र, भारतात नियमांची घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये मोठी दरी आहे. भ्रष्टाचार, निष्क्रिय प्रशासन आणि खाजगी वाहतूक व्यवस्थेतील अनियमितता कायम राहिल्यास हा निर्णयही इतर अनेक घोषणांप्रमाणे फक्त सरकारी फाईल्स आणि कागदांपुरताच मर्यादित राहील. आज गरज आहे ती फक्त कायदे करण्याची नाही, तर कायद्यावर विश्वास निर्माण करण्याची. अन्यथा 'पॅनिक बटण' ही संकल्पना देखील प्रवाशांच्या सुरक्षेऐवजी सरकारी घोषणांचा आणखी एक दिखावा ठरेल.

# उत्पादकता: यश, विकास आणि समृद्धीचा महामार्ग!



दरवर्षी २० जून रोजी जागतिक उत्पादकता दिन साजरा केला जातो. आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात उत्पादकता ही केवळ वैयक्तिक यशाची नव्हे, तर संस्थात्मक, औद्योगिक आणि राष्ट्रीय प्रगतीचीही गुरुकिल्ली बनली आहे. याच महत्त्वाची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी जागतिक उत्पादकता दिन साजरा केला जातो. हा दिवस कार्यक्षमता, नवकल्पना, वेळेचे व्यवस्थापन आणि गुणवत्तापूर्ण काम यांचे महत्त्व अधोरेखित करतो. उत्पादकतेत वाढ केल्याने कमी संसाधनांत अधिक परिणाम साधता येतात, आर्थिक विकासाला चालना मिळते आणि जीवनमान उंचावण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने उत्पादकतेची सवय अंगीकारून स्वतःच्या तसेच समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणे ही काळाची गरज आहे.

उत्पादकता म्हणजे उपलब्ध वेळ, श्रम, कौशल्य, ज्ञान आणि संसाधनांचा प्रभावी व कार्यक्षम वापर करून अधिकाधिक आणि गुणवत्तापूर्ण परिणाम साध्य करण्याची क्षमता होय. उत्पादकतेचा अर्थ केवळ जास्त प्रमाणात काम करणे असा नसून, कमी वेळेत, कमी खर्चात आणि कमी संसाधनांत अधिक चांगले परिणाम मिळवणे असा आहे. योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, शिस्त, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि कामातील गुणवत्ता यांमुळे उत्पादकता वाढते. उत्पादक व्यक्ती आपल्या कामाला प्राधान्यक्रम देते, उपलब्ध साधनांचा योग्य उपयोग करते आणि निश्चित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. म्हणूनच, कठोर परिश्रमापेक्षा स्मार्ट आणि परिणामकारक काम हीच उत्पादकतेची खरी ओळख आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी उत्पादकता अत्यंत महत्त्वाची आहे. ती वेळ, कौशल्ये आणि संसाधनांचा योग्य वापर करून कमी वेळेत अधिक आणि गुणवत्तापूर्ण काम करण्यास मदत करते. यामुळे वेळेचे प्रभावी व्यवस्थापन होते, कार्यक्षमता वाढते आणि शिस्त निर्माण होते. उत्पादकतेमुळे कामातील गुणवत्ता सुधारते, उद्दिष्टे वेळेत पूर्ण होतात आणि आत्मविश्वास वाढतो. तसेच तणाव कमी होऊन जीवनात संतुलन निर्माण होते. म्हणून उत्पादकता ही वैयक्तिक यशाची गुरुकिल्ली असून प्रत्येकाने ती अंगीकारणे आवश्यक आहे.

आजच्या जागतिक स्पर्धेच्या युगात बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी उत्पादकता अत्यावश्यक आहे. कार्यक्षम उद्योग बदलत्या ग्राहक गरजा आणि बाजारातील आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाऊ शकतात. त्यामुळे त्यांची स्पर्धात्मक क्षमता वाढते आणि ते दीर्घकाळ यशस्वी राहू शकतात. याशिवाय, उत्पादकतेमुळे नवकल्पना आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढतो. उत्पादन प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि परिणामकारक करण्यासाठी उद्योग नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करतात. यामुळे उत्पादनक्षमता वाढते, गुणवत्तेत सुधारणा होते आणि उद्योगाच्या विकासाला नवी दिशा मिळते. अशा प्रकारे, उद्योग आणि व्यवसायातील उत्पादकता ही आर्थिक प्रगती, ग्राहक समाधान, स्पर्धात्मकता आणि नवोन्मेष यांचा आधारस्तंभ आहे. उत्पादकतेत वाढ केल्याने उद्योग अधिक सक्षम बनतात आणि देशाच्या आर्थिक विकासालाही मोठे योगदान देतात.कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा पाया त्याच्या उत्पादकतेवर अवलंबून असतो. देशातील उद्योग, शेती, सेवा क्षेत्र आणि मनुष्यबळ यांची उत्पादकता जितकी अधिक असेल, तितक्या वेगाने राष्ट्राची प्रगती होते. त्यामुळे उत्पादकता ही राष्ट्रीय विकासाची प्रमुख प्रेरक शक्ती मानली जाते.

उत्पादकतेमुळे आर्थिक विकासाला गती मिळते. उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करून अधिक उत्पादन आणि सेवा निर्माण केल्या जातात. यामुळे देशाच्या उत्पन्नात वाढ होते, अर्थव्यवस्था मजबूत बनते आणि विकासाच्या विविध योजनांसाठी आवश्यक निधी उपलब्ध होतो. रोजगारनिर्मितीतही उत्पादकतेचे महत्त्वपूर्ण योगदान असते. उद्योग, व्यवसाय आणि विविध सेवा क्षेत्रांचा विस्तार झाल्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात. यामुळे बेरोजगारी कमी होण्यास मदत होते आणि नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडून येते. जागतिकीकरणाच्या युगात देशाची स्पर्धात्मकता टिकवून ठेवण्यासाठी उत्पादकता अत्यावश्यक आहे. अधिक दर्जेदार आणि किफायतशीर उत्पादने तयार करणारे राष्ट्र आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपले स्थान मजबूत करू शकते. यामुळे निर्यात वाढते, परकीय गुंतवणूक आकर्षित होते आणि देशाची जागतिक स्तरावरील प्रतिष्ठा उंचावते.

उत्पादकतेमुळे नैसर्गिक, आर्थिक आणि मानवी संसाधनांचा कार्यक्षम वापर होतो. संसाधनांचा अपव्यय टाळून त्यांचा योग्य पद्धतीने उपयोग केल्यास शाश्वत विकासाला चालना मिळते. यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठीही संसाधनांचे संरक्षण करता येते. याशिवाय, उत्पादकता वाढल्यामुळे समाजाच्या सर्व स्तरांवर सकारात्मक परिणाम दिसून येतात. उत्पन्न वाढते, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होते. परिणामी, सामाजिक आणि आर्थिक समृद्धी साध्य होते आणि राष्ट्र सर्वांगीण विकासाच्या दिशेने वाटचाल करते. अशा प्रकारे, उत्पादकता ही राष्ट्रीय विकासाची गुरुकिल्ली आहे. उत्पादक नागरिक, कार्यक्षम संस्था आणि प्रगत उद्योग यांच्या बळावरच सक्षम, समृद्ध आणि विकसित राष्ट्राची निर्मिती होऊ शकते.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने काम अधिक जलद आणि अचूक होते. संगणक, इंटरनेट आणि विविध डिजिटल साधनांचा प्रभावी वापर केल्यास उत्पादन प्रक्रिया सुलभ होते आणि कमी वेळेत अधिक काम साध्य करता येते. कौशल्यविकास आणि सतत शिक्षण घेणे हे देखील अत्यावश्यक आहे. नवीन कौशल्ये आत्मसात केल्याने कामाची गुणवत्ता सुधारते आणि बदलत्या परिस्थितीत स्वतःला जुळवून घेणे सोपे होते. सतत शिकण्याची वृत्ती उत्पादकतेला नवी दिशा देते. सकारात्मक दृष्टीकोन आणि शिस्त राखणे हे उत्पादकतेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. सकारात्मक विचारसरणीमुळे आव्हानांवर मात करणे शक्य होते, तर शिस्तबद्ध जीवनशैलीमुळे कामात सातत्य आणि नियमितता टिकून राहते. शेवटी, आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारणे अत्यंत आवश्यक आहे. चांगले शारीरिक आणि मानसिक आरोग्य असल्यास काम करण्याची ऊर्जा आणि एकाग्रता वाढते. योग्य आहार, व्यायाम आणि विश्रांती यांचा समतोल राखल्यास उत्पादकता नैसर्गिकरित्या वाढते. अशा प्रकारे, या सर्व बाबींचा अवलंब केल्यास व्यक्ती, संस्था आणि समाजाची उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढू शकते आणि विकासाचा मार्ग अधिक सुकर होतो.

उत्पादकता वाढविणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तिच्या आड येणाऱ्या अडथळ्यांची जाणीव असणेही आवश्यक आहे. अनेक वैयक्तिक आणि व्यावसायिक कारणांमुळे उत्पादकतेत घट होते आणि अपेक्षित यश मिळविणे कठीण होते. सर्वात मोठा अडथळा म्हणजे वेळेचा अपव्यय. अनावश्यक गप्पा, मोबाईलचा अतिवापर, सोशल मीडियावर जास्त वेळ घालवणे यामुळे महत्त्वाच्या कामांकडे दुर्लक्ष होते आणि कामाचा वेग कमी होतो. काम पुढे ढकलण्याची सवय ही देखील उत्पादकतेला बाधा आणणारी गंभीर समस्या आहे. उद्या करू ही वृत्ती वाढल्यास कामांचा डोंगर साचतो आणि शेवटी तणाव वाढतो, तसेच कामाची गुणवत्ता देखील कमी होते. योग्य नियोजनाचा अभाव असल्यास कामात गोंधळ निर्माण होतो. कोणते काम आधी करायचे आणि कोणते नंतर याची स्पष्टता नसल्याने वेळ व ऊर्जा वाया जाते आणि अपेक्षित परिणाम मिळत नाहीत.


तांत्रिक कौशल्यांची कमतरता हे आधुनिक काळातील महत्त्वाचे आव्हान आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करता न आल्यास कामाची गती मंदावते आणि कार्यक्षमतेवर परिणाम होतो. याशिवाय, नकारात्मक विचारसरणी आणि निष्क्रियता हेही उत्पादकतेतील मोठे अडथळे आहेत. आत्मविश्वासाचा अभाव, अपयशाची भीती आणि उत्साह कमी असणे यामुळे व्यक्ती आपल्या क्षमतेचा पूर्ण वापर करू शकत नाही. अशा प्रकारे, हे सर्व अडथळे दूर करून योग्य नियोजन, सकारात्मक दृष्टिकोन आणि शिस्त अंगीकारल्यास उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढविता येते.

उत्पादकता ही केवळ कामाची गती किंवा जास्त काम करण्याची क्षमता नसून ती जीवन जगण्याची एक सकारात्मक, शिस्तबद्ध आणि परिणामकारक पद्धत आहे. योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि संसाधनांचा प्रभावी वापर यांच्या साहाय्याने उत्पादकता वाढवता येते आणि जीवन अधिक यशस्वी बनवता येते. उत्पादक व्यक्ती आपल्या कार्यक्षमतेमुळे यश प्राप्त करते, उत्पादक संस्था सातत्याने प्रगती करते आणि उत्पादक राष्ट्र समृद्धीच्या दिशेने वाटचाल करते. त्यामुळे उत्पादकता ही वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय विकासाचा मजबूत आधार आहे. म्हणूनच, उत्पादकता: यश, विकास आणि समृद्धीचा महामार्ग! हे सूत्र आत्मसात करून प्रत्येकाने आपल्या जीवनात कार्यक्षमता, शिस्त आणि सातत्य वाढवण्याचा संकल्प करावा. यामुळेच उज्ज्वल भविष्य आणि सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो.

**–डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

# पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली

आज २० जून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांचा स्मृतिदिन. २० जून १९८७ रोजी डॉ. सलीम अली यांचे निधन झाले. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लीम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. डॉ. सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई-वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला.



सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे? त्याचे नाव काय आहे? हे त्यांना माहीत नव्हते, म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले. मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली. तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्ष्यांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ. सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्ष्यांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ. सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला.

लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी. ए. ऑनर्स ही पदवी मिळवली. मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती. त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही. मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन श्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ त्यांनी इंग्लंडमध्येही काम केले.

१९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ. सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बीएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोधनिबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ. सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली. ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले.

डॉ. डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्ष्यांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ. सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ. सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ. सलीम अली यांचे २० जून १९८७ रोजी निधन झाले. डॉ. सलीम अली यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# पाणी वाचावा - पाणीबाणी टाळा!

यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यातील नागरिकांना सहन करावा लागला. तारखेनुसार पावसाळा सुरु झाला असला तरी आज जून महिना अर्धा संपला तरी पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे राज्यातील नागरिकांसह पशु-पक्षीही हैराण झाले आहेत. उष्माघाताने यंदा अनेक पशु-पक्षांचा बळी घेतला. काहींच्या मते यंदा राज्यात अभूतपूर्व दुष्काळ अनुभवायला मिळणार आहे. भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागणार आहे. पाणी ज्याचे दुसरे नावच जीवन आहे. पाण्याविना जगणे केवळ असह्य आहे. केवळ पिण्यासाठीच नव्हे तर कपडे धुणे, भांडी घासणे, दैनंदिन स्वच्छता यांसाठी पाण्याला पर्याय नाही. पाण्याचा एकमेव स्रोत म्हणजे पाऊस आणि तोच लांबल्याने पाणी पुरवठ्याची सर्व गणिते कोलमडू लागली आहेत त्यामुळे अनेक शहरी भागांत पाणी कपात सुरु आहे. काही भागांत एक दिवसाआड तर काही भागांत आठवड्यातून एकदा पाणी पुरवले जात आहे. वाढती लोकसंख्या, शहरांत सुरु असलेली विकासकामे यांमुळे उपलब्ध पाणी साठ्यावर प्रचंड ताण येत असतो.

उन्हाळा सुरू झाला की, राज्य तसेच जिल्हा प्रशासनाकडून दरवर्षी पाणी वाचवण्याचे आवाहन करण्यात येते. आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा शेजारी पाजारी अन्य कोणी पाण्याची बचत करताना दिसत नाहीत, मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात. मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधलपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्व, पैसे वाचवण्याचे महत्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहेनत याबाबतची जाण आपल्या प्रत्येकाला आहे.

आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्वही आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते. पाणी वाचवणे म्हणजे अस्वछ राहणे असे मुळीच नव्हे,आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. आंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हें प्रत्येकाला ज्ञात असते. त्यामध्येही उन्हाळ्यात जर आपण शॉवरचा वापर करत असू तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो, हात धुताना हाताला हँडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतांनाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही.

कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेव्हढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल तर त्वरित पाणी खात्याला



कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगुया. आपण जर सोसायटीत राहत असू तर सोसायटीची मिटिंग घेऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न सामूहिकपणे करण्याचा प्रयत्न करूया!

पाण्याला जीवन असे म्हटले जाते. फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये महागडे जेवण जेवल्यानंतरही ते पचण्यासाठी जेवणांनंतर किमान ग्लासभर पाणी तरी आपल्याला हवेच असते. पाण्याविना जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. काही देशांमध्ये पाणीटंचाईमुळे इंधनाच्या दरात पाणी विकले जात असल्याच्या बातम्या आजवर आपण वाचल्या आहेत. आज आपण पाणी नाही वाचवले तर भविष्यात भारतातही अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी पाणी वाचवण्याची सवय आतापासून अंगवळणी पाडूया ! ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे आणि ज्या प्रमाणात पाण्याचा व्यय होत आहे ते पाहता उपलब्ध जलसाठे दरवर्षी अपुरेच पडतात. गेल्या काही वर्षांचा अंदाज घेता हवामान खाते आणि पाऊस यांचे गणित कधी जुळताना दिसत नाही त्यामुळे यंदाही पुरेसा पाऊस पडेल याची काहीच शाश्वती नाही.

राजकीय मंडळींकडून महाराष्ट्र राज्य समृद्ध पथावर असल्याचे कितीही सांगण्यात येत असले, तरी राज्याच्या काही भागांतील नागरिकांना दरवर्षी भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. ५-६ किलोमीटर अंतर पायपीट करून पाणी आणावे लागते. पाण्याच्या एका थेंबासाठी दरवर्षी कितीतरी पशु पक्ष्यांचा बळी जातो. भगवंताच्या कृपेमुळे आपल्याला पुरेसे पाणी मिळते त्याबद्दल आपण कृतदक्य राहूया आणि आतापासूनच पाणी बचतीची सवय स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला लावून घेऊया जेणेकरून भविष्यात पाणीबाणी निर्माण झालीच तर तिचा सामना आपल्याला समर्थपणे करता येईल !

**–जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# ऑक्सीजन देणारी झाडे लावा -आ. चिखलीकर



**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरातील नागरिकांनी ऑक्सीजन देणारी झाडे लावावीत व लोहा न.प. ने चांगले काम करावे. शहराला जेवढा निधी लागेल तेवढा निधी देऊ. विकास कामांना निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली. लोहा येथे दि. १८ जून २०२६ रोजी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त लोहा नगर परिषदेच्या वतीने आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते.

लोहा शहरातील मुख्य रस्त्यावर बसस्थानकासमोर माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त लोहा नगर परिषदेच्या वतीने वृक्ष लागवड कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमांचे उद्घाटन लोहा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोहा न.प.चे माजी नगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, युवानेते सचिन पाटील चिखलीकर, लोहा न. प. चे नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपाध्यक्ष करीम शेख मुजावर, लोहा पं. स. चे माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, लोहा पं.स. चे माजी सभापती खुशालराव पाटील, कंधार न. प. चे उपाध्यक्ष मन्नान चौधरी, लोहा न.प.चे गटनेते भास्करराव पाटील पवार, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, नगरसेवक हरीभाऊ चव्हाण, श्यामअण्णा पवार, शंकर वट्टमवार, केतन खिल्लारे, सदा तेलंग, राजेश बोडके, इरबा पवार, रावसाहेब मंजलवाड, सतीश निखाते, तुकाराम दाढेल, नारायण येलरवाड, माजी स्वच्छता सभापती बाबुराव डोम, माजी नगरसेवक रमेश माळी, शिवाजी आंबेकर, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक अंकुशराव पाटील कदम, लांडगेवाडीचे सरपंच बाळासाहेब टोपारे, धावरीचे माजी सरपंच अभंग पाटील गाडेकर, मारोती ऐजगे, भूषण दमकोंडवार, नामदेव पवार, शेलगावचे सरपंच मारोती पाटील कदम, रज्जाक शेख, राहुल पाटील बोरगावकर आदी उपस्थित होते.

यावेळी लोहा बस स्थानका-समोरील मुख्य रस्त्याच्या दुभाजकामध्ये आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली.

यावेळी पुढे बोलताना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात सर्वप्रथम लोहा न.प. ने वृक्ष लागवड करण्याचे काम हाती घेतले आहे. स्व. अजितदादा पवार यांची पहिली आवड वृक्ष लागवड करण्याची होती. बारामती शहर हे भारतात सर्वात हिरवेगार शहर आहे. तसेच आपल्याला लोहा शहर करायचे आहे. लोहा न. प., संत फाऊंडेशन व सामाजिक वनीकरण या तिघांच्या माध्यमातून हे वृक्षारोपण होत आहे. नुसते वृक्षारोपण करुन चालणार नाही तर आपल्याला झाडे जगवावे लागतील. आपण स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त लोहा शहरात १ लाख ५१ हजार झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. जूनच्या शेवटच्या आठवड्यात पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे खड्डे करण्याचे काम चालू आहे. येणाऱ्या काळात हरित लोहा म्हणून ओळखले जाईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

कोरोनाच्या काळात माणसाला ऑक्सीजन मिळत नव्हते. भविष्यात आपल्याला ऑक्सीजनही मिळणार नाही त्यासाठी झाडे लावा, गेल्यावर्षी आम्ही नागबर्डी देवस्थानला १० हजार झाडे लावली. तिथे ७ हजार झाडे जगली व तेथील वातावरण बघून जास्तीत जास्त लिंबाचे झाडे लावली होती. नगराध्यक्ष शरद पवार यांच्या टीमच्या काळातच लोहा शहर हरित करुया, यासाठी त्यांनी सर्वांना विश्वासात घेऊन काम करावे, असे आमदार चिखलीकर म्हणाले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी केले तर सूत्रसंचालन बी. डी. जाधव यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार लोहा नगर परिषदचे गटनेते भास्करराव पाटील पवार यांनी मानले.

# हिमायतनगर तहसील प्रशासन जागे झाले; वडगावकर यांच्या अर्धनग्न आंदोलनानंतर अधिकाऱ्यांची धावपळ

## प्रलंबित प्रश्नांवरून संतापाचा उद्रेक; प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित



**नांदेड (प्रतिनिधी)**– हिमायतनगर तालुक्यातील प्रलंबित विकास कामे, रखडलेले पांदण रस्ते, महसूल विभागातील दिरंगाई आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे होत असल्याची तक्रार केली. या दुर्लक्षामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वामनराव पाटील वडगावकर यांनी गुरुवार, दि. १८ जून रोजी तहसील कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन करून महसूल प्रशासनाला धारेवर धरले. तहसील कार्यालयाच्या पायरीवर बसून केलेल्या या आंदोलनामुळे काही काळ परिसरात खळबळ उडाली.

प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत वडगावकर यांनी नागरिकांच्या प्रश्नांबाबत अधिकाऱ्यांच्या उदासीनतेचा निषेध नोंदविला. निवेदने दिली, अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या, पाठपुरावा केला; मात्र प्रश्न जैसेथेच आहेत. त्यामुळे अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला, अशी प्रतिक्रिया वडगावकर यांनी यावेळी व्यक्त केली.

विशेषतः ग्रामीण भागातील पांदण रस्ते, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे, शासकीय योजनांची अपुरी अंमलबजावणी आणि शेतकरी-मजुरांच्या प्रश्नांवर प्रशासन गंभीर नसल्याचा आरोप त्यांनी केला. काही दिवसांपूर्वी पांदण रस्ते खुले करून त्यांचे मजबुतीकरण करण्याबाबत आदेश निघूनही प्रत्यक्ष कामे सुरू नसल्याने त्यांनी संताप व्यक्त केला.

आंदोलनाची माहिती मिळताच नायब तहसीलदार पंगे, मंडळ अधिकारी चव्हाण यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

मात्र, केवळ आश्वासनांवर समाधान मानणार नसून मागण्यांची लवकर पूर्तता न झाल्यास आणखी तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वामनराव पाटील वडगावकर यांनी दिला आहे. या आंदोलनामुळे हिमायतनगर तालुक्यात महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, आता प्रशासन प्रत्यक्षात काय पावले उचलते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त माता गुजरीजी उद्यान येथे वृक्षारोपण



**नांदेड (प्रतिनिधी)** –पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्यासाठी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त दि. ५ जून २०२६ रोजी नांदेड शहरातील माता गुजरीजी उद्यान नांदेड येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करून वृक्षाचे महत्व या विषयावर संवाद साधण्यात आला.

या कार्यक्रमास नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त महेशकुमार डोईफोडे, जिल्हा युवा अधिकारी आशनी कानकटे, भारतीय जनता पार्टी प्रदेश उपाध्यक्ष डॉ. मोहन चव्हाण, विजय पवार, कार्यक्रमाचे संयोजक लवकुश जाधव, प्रकाश झडते, अंकुश जाधव, संभाजी सावते, प्रकाश सोनकांबळे, शैलेश गजभारे, शंकर आंदूरे, मनोहर राठोड यांच्यासह अनेक सेवाभावी संस्था, युवा मंडळ, पर्यावरण प्रेमी यांची उपस्थिती होती.

यावेळी उद्यान परिसरामध्ये अनेक प्रकारच्या वनस्पती वृक्षांचे रोपटे लावून पहाटे मॉर्निंग वॉकसाठी व सायंकाळी उद्यानात येणाऱ्या लहान बालक, वृद्ध नागरिकांनाही शुद्ध ऑक्सीजन मिळावे या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. शेवटी लवकुश जाधव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# येळेगावातील कर्जबाजारी शेतकऱ्याची कंटाळून आत्महत्या

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– अर्धापूर तालुक्यातील येळेगाव येथील शेतकरी गुणाजी बापूराव पवार (वय ३९ वर्षे) यांच्याकडे बँकेचे पीक कर्ज व खाजगी फायनांस कंपनीचे कर्ज होते. हे कर्ज कसे फेडायचे या चिंतेत व



सततच्या नापिकीला कंटाळून त्यांनी दि.१५ जून रोजी राहत्या घरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. त्यांच्यावर नांदेड येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. गुरुवार, दि. १८ जून रोजी सकाळी चार वाजता त्यांचे निधन झाले.

शेतकरी गुणाजी पवार यांच्या पश्चात वडील, आई, पत्नी, ४ मुली, एक भाऊ असा परिवार आहे. ते कपिल बापुराव पवार यांचे मोठे बंधू होत.

# सोयाबीनसोबत तूर आंतरपीक पद्धतीचा अवलंब करण्याचे कृषी विभागाचे आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)**– सध्याच्या हवामानातील अनिश्चितता व यावर्षी एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे असमान वितरण, खंडित पाऊस अथवा दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी जोखीम कमी करण्यासाठी व उत्पादनाची शाश्वती वाढविण्यासाठी सोयाबीन + तूर आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

आंतरपीक पद्धती ही हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर एक प्रभावी जोखीम व्यवस्थापन तंत्र आहे. सोयाबीन व तूर या पिकांची वाढ, अन्नद्रव्यांची गरज व कालावधी वेगवेगळा असल्याने दोन्ही पिके एकत्र घेतल्यास उपलब्ध पाणी, सूर्यप्रकाश व जमिनीतील अन्नद्रव्यांचा अधिक कार्यक्षम वापर होतो.

नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, पावसातील खंड किंवा इतर प्रतिकूल हवामानामुळे एका पिकाचे नुकसान झाल्यास दुसऱ्या पिकापासून उत्पादन मिळण्याची शक्यता राहते. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान कमी होऊन त्यांच्या हातात काही ना काही उत्पादन निश्चितपणे येण्यास मदत होते. ही पद्धत शेती व्यवसाय अधिक सुरक्षित व शाश्वत बनविण्यास उपयुक्त ठरते.

सोयाबीन व तूर आंतरपीक पद्धतीमध्ये शिफारशीनुसार ४:२ किंवा ६:२ ओळींचे प्रमाण ठेवावे. तसेच सुधारित वाणांची निवड, संतुलित खत व्यवस्थापन, वेळेवर तण नियंत्रण व एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करावा.

हवामानातील अनिश्चितता लक्षात घेऊन पीक विविधीकरणास प्राधान्य द्यावे व सोयाबीन + तूर आंतरपीक पद्धतीचा अवलंब करून उत्पादन व उत्पन्नाची शाश्वती वाढवावी, असे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद शाळा बाभुळगाव येथे तहसीलदार संजय वारकड यांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तके वाटप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– शाळेच्या पहिल्या दिवशी नांदेड तालुक्यातील बाभुळगाव येथील नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मान्यवरांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आली. यावेळी शाळा परिसरात रांगोळी काढून सुशोभीकरण करण्यात आले होते.

१५ जून रोजी जिल्हा परिषद शाळा् बाभुळगाव येथे शाळेच्या पहिल्या दिवशी पहिलीच्या वर्गतील विद्यार्थ्यांचे स्वागत व मोफत पाठ्यपुस्तके नांदेडचे तहसीलदार संजय वारकड, सरपंच तथा प्रशासक पुंडलिक पाटील मस्के, मंडळ अधिकारी संतोष असकुलकर, तलाठी योगीता अन्नमवार, मुख्याध्यापक सर्जे, शालेय समिती अध्यक्षा चित्रा मस्के, पोलीस पाटील संतोष मोरे, पोलीस पाटील आनंदा पवार, गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# पूर्णा यार्ड येथे रेल्वे अपघात बचाव व पुनर्स्थापना कार्यासाठी एनडीआरएफच्या सहभागासह पूर्ण क्षमतेची मॉक ड्रिल



**नांदेड (प्रतिनिधी)**– रेल्वे आपत्कालीन परिस्थितीत विविध यंत्रणांमधील समन्वय व सज्जतेची चाचणी घेण्यासाठी पूर्णा रेल्वे स्थानक यार्ड येथे वरिष्ठ रेल्वे अधिकारी, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य शासन व जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या प्रमाणावर रेल्वे अपघाताचे अनुकरण करणारी सर्वसमावेशक मॉक ड्रिल यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली.

या मॉक ड्रिलमध्ये उन्हाळी विशेष एक्स्प्रेस गाडी क्रमांक ००००१ ला अपघात झाल्याची परिस्थिती निर्माण करण्यात आली. त्यामध्ये एक सामान्य द्वितीय श्रेणी डबा (क्रमांक ०३७४३५) वेगळा झाल्याचे आणि दुसरा डबा गार्ड-कम-लगेज व्हॅन (SC क्रमांक ०११०३७ GSLR) वर चढल्याचे दर्शविण्यात आले. ही घटना पूर्णा स्थानक यार्डमध्ये मास्ट क्रमांक ३१९/१२५२-१२५६ जवळ सकाळी ०९:०५ वाजता घडल्याचे गृहीत धरण्यात आले. आपत्कालीन कार्यवाहीसाठी शेजारील रेल्वे मार्ग मोकळा ठेवण्यात आला. अनुकरणात्मक आपत्कालीन परिस्थितीनुसार अपघात निवारण रेल्वेगाडी (RT), स्वयंचलित वैद्यकीय मदत वाहन (ड्झचठत), अग्निशमन दल, NDRF, सिव्हिल डिफेन्स, रेल्वे वैद्यकीय पथके आणि रेल्वे सुरक्षा बल (RPF) यांना तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आले.

मुख्यालयातून मुरली कृष्णा, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी तथा प्रधान मुख्य सिग्नल व दूरसंचार अभियंता, धर्मेंद्र कुमार, मुख्य यांत्रिक अभियंता (नियोजन), मुथुस्वामी, उपमुख्य यांत्रिक अभियंता/डिझेल, किशोर, उपमुख्य सुरक्षा अधिकारी/यांत्रिक तसेच वरिष्ठ विभागीय वैद्यकीय अधिकारी/चीफ लगद/सिकंदराबाद यांनी या सरावात सहभाग घेतला. नांदेड विभागाकडून विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री कल्याण राजू तसेच सुरक्षा, अभियांत्रिकी, संरक्षा, वैद्यकीय, विद्युत, ट्रॅक्शन, सिग्नल, परिचालन, यांत्रिक, वाणिज्य आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# ‘नशामुक्त भारत अभियान सप्ताह’ उत्साहात साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा परिषद समाजकल्याण कार्यालय नांदेड व कै. सोपानराव तादलापूरकर क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘नशामुक्त भारत अभियान सप्ताहा’निमित्त शिवाजी विद्यालय सिडको, नांदेड येथे शालेय विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त राहण्याची शपथ देऊन जनजागृती करण्यात आली.

तरुण हे कोणत्याही राष्ट्राची ऊर्जा असून, त्यांच्या शक्तीचा समाज व देशाच्या विकासात मोलाचा वाटा असतो. त्यामुळे जास्तीत जास्त तरुणांनी नशामुक्त भारत अभियानाशी जोडले जावे, या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या मनावर व्यसनमुक्तीचे महत्त्व बिंबविण्यात आले.

यावेळी शिवाजी विद्यालयाचे पर्यवेक्षक व्ही. एस. पाटील, सौ. के. पी. पल्लेवाड, एस. आर. भोसीकर, बी. बी. पाटोळे, एस. डी. शिंदे तसेच कै. सोपानराव तादलापूरकर क्रीडा मंडळाचे अध्यक्ष कैलास गायकवाड, माहेश्वरी गायकवाड, साधना गायकवाड, शिवशंकर मुळे आदी उपस्थित होते.

# पालकांनी आपल्या पाल्यांचा जिल्हा परिषद शाळेतच प्रवेश द्यावा -शिवाजी राठोड



**लोहा (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात सध्या नवीन शैक्षणिक वर्ष २०२६/२७ ची सुरुवात झाली आहे. तालुक्यातील सुनेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शाळेच्या पहिल्याच दिवसी उपअभियंता शिवाजीराव राठोड यांच्या वतीने विद्यार्थ्यांचे पुस्तक, वही, पेन व खाऊ देवून स्वाागत करण्यात आले. यावेळी शिवाजी राठोड यांनी पालकांना जिल्हा परिषद शाळेतच प्रवेश द्यावा, असे आवाहन केले.

जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात असून, शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत आहे. ते पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, कार्यपुस्तिका, गणवेश, बूट, सॉक्स तसेच रुचकर व पौष्टिक मध्यान्ह भोजनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. याशिवाय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा, सांस्कृतिक व विविध शैक्षणिक उपक्रम नियमित राबविण्यात येतात.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शिक्षकांकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अध्यापन केले जात असून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शैक्षणिक विकासावर भर दिला जात आहे. यावेळी त्यांनी नवीन शैक्षणिक वर्षासाठी पालकांनी आपल्या पाल्यांचा जिल्हा परिषद शाळेत प्रवेश निश्चित करून शाळेच्या प्रगतीस सहकार्य करावे, असे आवाहन केले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक यू. टी. राजारुपे, सहशिक्षक डी.जी. घोडके, पंदलवाड, नागनाथ सानप, काचमांडे, आनकाडे, गोडणारे, सौ. कळसकर, सौ.राठोड, सौ. एन. एन. भंडारे आदींसह शालेय व्यवस्थापन समिती व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेडच्या डॉ. नितेश घुंगरवार यांची पॅसिफ इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्मोलॉजी अँड सेल्फॉलॉजी, ओडिशा येथे व्हिजिटिंग प्राध्यापकपदी नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्याचे सुपुत्र तथा कॉस्मोलॉजी विषयातील युवा संशोधक डॉ. नितेश गंगाधरराव घुंगरवार यांची पॅसिफ इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्मोलॉजी अँड सेल्फोलॉजी (PICS), सागर, ओडिशा येथे व्हिजिटिंग प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. घुंगरवार यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील गणितीय शास्त्रे संकुलातून कॉस्मोलॉजी विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यांनी हे संशोधन विद्यापीठाचे कुलसचिव तथा प्रख्यात संशोधक प्रा. डॉ. ज्ञानेश्वर डी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

त्यांचे संशोधन कार्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले असून, त्यांनी जिनिव्हा विद्यापीठ (स्वित्झर्लंड), सोफिया विद्यापीठ (बल्गेरिया) आदी ठिकाणी आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन सादर केले आहे. तसेच किंग साऊद विद्यापीठ (सौदी अरेबिया), अरिस्टॉटल युनिव्हर्सिटी (ग्रीस) आणि RUDN युनिव्हर्सिटी (रशिया) येथील संशोधकांसोबत संयुक्त संशोधन करून नामांकित आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये संशोधन निबंध प्रकाशित केले आहेत.

कॉस्मोलॉजी विषयातील संशोधनासोबतच त्यांनी सेल्फोलॉजी या नव्या संशोधन क्षेत्रातही कार्य सुरू ठेवले आहे. या क्षेत्रातील जागतिक ख्यातीचे संशोधक व जगातील अव्वल दोन टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश असलेले डॉ. शिबेश कुमार जॅस पॅसिफ यांच्या सहकार्याने ते संशोधन करत आहेत.

# १२ व्या जागतिक योग दिवसानिमित्त पाच दिवसीय योग शिबीर



**नांदेड (प्रतिनिधी)**– बाराव्या जागतिक योग दिनाचे औचित्य साधून पतंजली योग परिवार नांदेडतर्फे आनंद सागर सोसायटी हडको येथील श्री बालाजी मंदिर देवस्थानच्या प्रांगणात सकाळी पाच ते सात दरम्यान ५ दिवसीय योग शिबिराची सुरुवात करण्यात आली.

या शिबिरास पतंजलीचे राज्य प्रभारी अनिल अमृतवार यांचे योग दिनाच्या प्रोटोकॉलप्रमाणे मार्गदर्शन झाले. हे योग शिबीर २१ तारखेला संपणार आहे. या प्रसंगी नांदेड योग समितीचे कार्यकारिणी सदस्य सदाशिव बुटले पाटील, शिवाजीराव शिंदे हळदेकर, अनिल कामीनवार, देवेश सलगरकर तसेच हडको परिसरातील सर्व योगसाधक, योगशिक्षक सर्वश्री अरुण दमकोंडवार, विभावरी देशमुख, बालाजी वारकड, बाळासाहेब जगदंबे, प्रकाश येरावार, यश पानपट्टे, माणिकराव देशमुख, पांडुरंग कदम, आईनाथ गवळी, शिवकुमार बितनवार, जयवंत सोमवाड, रत्नाकर अमीलकंठवार, सतीश पाटील, संजय गायकवाड, कल्याणकर पाटील, सतीश कवटिकवार, साहेबराव नरंगलेकर, डॉ. सुरेखा कलंत्री, अरुणा नांदेडकर, बेबीताई गुपीले, बालाजी इंगेवाड, डॉ. देशमुख, सारिका भंडारी, प्रणिता शिंदे, कविता मोरे, अंकिता अमीलकंठवार, राखी भंडारी, भगीरथाबाई बच्चेवार, रमेश फुलारी आदी मान्यवर उपस्थित होते.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# ट्रेनमधील सीटवर कब्जा?

## तुमची कन्फर्म सीट 1 मिनिटात होईल रिकामी, फक्त फोनवर या 3 गोष्टी करा...

**ट्रेनच्या प्रवासादरम्यान वाईट अनुभव तेव्हा येतो, जेव्हा कोणीतरी तुमची कन्फर्म सीट व्यापून बसते आणि विनंती किंवा युक्तिवाद करूनही ती रिकामी करण्यास नकार देते. अशा परिस्थितीत तुम्ही काय कराल? तुम्ही टीटीईला (TTE) कॉल करून सीट रिकामी करून घ्याल का? क्षणभरासाठी असे गृहीत धरूया की ट्रेनमध्ये खूप गर्दी आहे (जे सहसा असतेच) आणि टीटीई (TTE) जवळपास नाही. अशा परिस्थितीत तुम्ही तुमची जागा रिकामी करण्यासाठी तुमच्या फोनचा वापर करू शकता. रेल्वे एसएमएस, कॉल्स आणि ॲप्सद्वारे ही सुविधा देते, ज्याचा वापर करून तुमच्या नावावर आरक्षित असलेली जागा जर आधीच कोणी घेतली असेल तर तुम्ही ती रिकामी करून घेऊ शकता.**



### एसएमएसद्वारे तुमची जागा रिकामी करा

तुम्ही तुमच्या फोनवरून एसएमएस पाठवूनही तुमची आरक्षित जागा रिकामी करू शकता. हे करण्यासाठी : 139 वर मेसेज पाठवणे सुरू करा. COMPLAINT <तुमचा 10-अंकी PNR क्रमांक» <तुमची समस्या» टाइप करा. लक्षात ठेवा की मेसेजचा फॉरमॅट अचूक असणे आवश्यक आहे. (उदाहरणार्थ : COMPLAINT 1234567890 My confirm seat number 24 on coach S3 is occupied by someone else.) हा मेसेज १३९ वर पाठवा.

### कॉलद्वारे सीट रिकामी कशी करावी?

जर तुम्हाला टेक्स्ट मेसेज पाठवणे सोयीचे वाटत नसेल, तर तुम्ही कॉलद्वारे देखील तुमची तक्रार नोंदवू शकता. यासाठी तुम्हाला १३९ वर कॉल करून तुमचा PNR, ट्रेन क्रमांक आणि सीटची माहिती द्यावी लागेल. त्यामुळे, कॉल करण्यापूर्वी आवश्यक तपशील तयार ठेवा.

### ॲपद्वारे सीट रिकामी कशी करावी?

तुम्ही RailMadad ॲपद्वारे देखील तुमची सीट रिकामी करून घेऊ शकता. हे करण्यासाठी : ॲपमध्ये लॉग इन करा आणि होम स्क्रीनवरील 'ट्रेन तक्रार' (Train Complaint) हा पर्याय निवडा. त्यानंतर १०-अंकी PNR क्रमांक टाका. आता तुम्ही तक्रारीचा प्रकार म्हणून 'कोचमधील तक्रारी' (In-Coach Complaints) निवडू शकता. यानंतर, उप-श्रेणीमध्ये 'अनाधिकृत व्यक्तीने व्यापलेली जागा' (Seat Occupied by Unauthorized Person) निवडा. वर्णनामध्ये तुमची समस्या लिहा. त्यानंतर सबमिट (Submit) वर क्लिक करा.

### तक्रार दाखल केल्यानंतर काय होते?

तक्रार दाखल केल्यानंतर, तुम्हाला सर्वप्रथम एक विशिष्ट तक्रार क्रमांक मिळेल. तुमची तक्रार ट्रेनमधील टीटीईकडे (TTE) असलेल्या टॅबलेटवर दाखवली जाईल. जर समस्या गंभीर असेल तर जवळच्या स्टेशनवरील आरपीएफ (RPF) किंवा जीआरपीला (GRP) सूचना (alert) पाठवली जाऊ शकते. टीटीई किंवा सुरक्षा कर्मचारी तुमच्या बर्थवर येतील आणि तुमच्यासाठी जागा रिकामी केली जाईल. यानंतर, तुमचा अभिप्राय (feedback) घेऊन तक्रार बंद केली जाईल.

# एलन मस्कच्या साम्राज्यात मुकेश अंबानींची एंट्री!

## जिओ अवकाशात 1,650 उपग्रह पाठवणार

**सॅटेलाइट इंटरनेटच्या जगात आधीच आपले साम्राज्य उभारलेल्या एलन मस्कच्या 'स्टारलिंक'च्या समोर मुकेश अंबानींची रिलायन्स जिओ एंट्री करणार आहे. एका अहवालानुसार, रिलायन्स जिओ हे ब्रॉडबँड इंटरनेट आणि डायरेक्ट-टू-डिव्हाइस सिग्नल्स देण्यासाठी पुढील दोन ते तीन वर्षांत स्वतःचे उपग्रह प्रक्षेपित करण्याची योजना आखत आहे. कंपनी आपले १,६०० ते १,६५० उपग्रह पृथ्वीच्या लो-अर्थ ऑर्बिटमध्ये पाठवेल.**





» सरकारकडे प्रस्ताव पाठवला : मुकेश अंबानींच्या कंपनीने या संदर्भात अंतराळ नियामक संस्था इन-स्पेसकडे एक प्रस्ताव सादर केला आहे. जर याला मंजुरी मिळाली, तर रिलायन्स जिओ आणि स्टारलिंक या दोन्ही कंपन्यांचे उपग्रह पृथ्वीच्या लो-अर्थ ऑर्बिटमध्ये असतील, ज्यामुळे भारताला सॅटेलाइट इंटरनेटशी जोडण्यासाठी सरकारला नवीन पर्याय उपलब्ध होतील.



» सॅटेलाइट इंटरनेट क्षेत्रातील पहिली भारतीय कंपनी : आतापर्यंत कोणत्याही भारतीय कंपनीने सॅटेलाइट इंटरनेट क्षेत्रात प्रवेश केलेला नाही. जर जिओला मंजुरी मिळाली, तर ती उपग्रह क्षेत्रात प्रवेश करणारी पहिली भारतीय कंपनी ठरेल. सध्या, स्टारलिंकचे सर्वात मोठे उपग्रह इंटरनेट नेटवर्क आहे. एलॉन मस्कच्या कंपनीने यापूर्वीच सुमारे १०,००० उपग्रह अवकाशात प्रक्षेपित केले आहेत. त्यांनी ३०,००० उपग्रह पाठवण्यासाठी अमेरिकी सरकारकडे परवानगी मागितली आहे.

» भारताला कोणते फायदे होतील? : रिलायन्स जिओच्या उपग्रह इंटरनेट क्षेत्रातील प्रवेशामुळे परदेशी उपग्रह कंपन्यांवरील भारताचे अवलंबित्व कमी होण्याची दाट शक्यता आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव, जगभरातील अनेक देश हे परदेशी उपग्रह कंपन्यांवरील आपले अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. असे म्हटले जाते की, जर इतर भारतीय कंपन्यांनी या क्षेत्रात प्रवेश केला, तर सरकार त्यांनाही पूर्ण पाठिंबा देईल. या प्रकरणी जिओ किंवा इन-स्पेसकडून अद्याप कोणताही प्रतिसाद आलेला नाही.

» भारतात सॅटेलाइट इंटरनेट सेवा? : भारतात अद्याप सॅटेलाइट इंटरनेट सेवा सुरू झालेली नाही. स्टारलिंक, एअरटेल-वनवेब आणि जिओ यांनी त्यांच्या भागीदार कंपनीसह या सेवेसाठी अर्ज केला आहे. पूर्वीच्या वृत्तांनुसार, स्टारलिंकला मंजुरी मिळणार नाही, असे म्हटले जात होते. तथापि, सरकारने हे स्पष्टपणे सांगितलेले नाही. सरकार सर्व कंपन्यांच्या अर्जांची तपासणी करत आहे. वृत्तांनुसार, भारतातील सॅटेलाइट इंटरनेट सिग्नल आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडू नयेत, अशी सरकारची इच्छा आहे.

# 6G लाँच करण्यासाठी कंपन्यांना फुटला घाम!

## केवळ सॉफ्टवेअर अपग्रेड पुरेसे ठरणार नाही, समस्या कुठे आहे?

**जर तुम्ही 5G च्या कामगिरीवर फारसे समाधानी नसाल आणि 6G बद्दल उत्सुक असाल, तर आम्ही तुम्हाला सांगतो की 6G मध्ये अपग्रेड करणे सोपे नसेल. सुरुवातीला, 5G ला पुढे करून ऑटोमेटिक कार आणि रोबोटिक सर्जरी यांसारखी अनेक आश्वासने दिली गेली होती, परंतु 5G हे मूलतः फक्त हाय-स्पीड इंटरनेट असल्याचे सिद्ध झाले आहे. जग 6G कडे वाटचाल करत असताना कंपन्या सावधपणे पावले टाकत आहेत... आतापर्यंत असा विश्वास होता की 5G वरून 6G मध्ये शिफ्ट होणे हे केवळ एक सॉफ्टवेअर अपग्रेड असेल, परंतु AI च्या आगमनाने परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे, ज्यामुळे कंपन्या गोंधळात पडल्या आहेत.**

» 6G वर जाणे कठीण का असेल? : कंपन्यांनी सुरुवातीला सांगितले होते की 6G ही केवळ 5G ची एक सुधारित आवृत्ती असेल आणि कंपन्यांना नवीन हार्डवेअरचा खर्च करावा लागणार नाही. तथापि, AI आणि स्मार्टग्लासेससारखी तंत्रज्ञानं अजून लोकप्रिय झाली नव्हती. आताच्या अहवालांनुसार, एरिक्सन आणि नोकियासारख्या कंपन्यांना वाटते की 6G मुळे बाजारपेठेत मोठ्या गुंतवणुकीचा काळ सुरू होऊ शकतो. यामुळे ऑपरेटर्सना इच्छा नसतानाही महागडे हार्डवेअर खरेदी करण्यास भाग पडेल. याचा कंपन्यांच्या बजेटवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

» 6G वर पैसे का खर्च करावेत? : 6GHz आणि 7GHz सारख्या उच्च फ्रिक्वेन्सी बँड्समुळे 6G साठी महागड्या हार्डवेअरची आवश्यकता असेल. सध्याचे 4G आणि 5G बँड्स आधीच पूर्ण भरलेले आहेत आणि नवीन 6G सिग्नल्स दूरपर्यंत प्रवास करू शकत नाहीत आणि भिंतींमधूनही जाऊ शकत नाहीत. या समस्येवर उपाय म्हणून, कंपन्यांना महागडे अँटेना आणि बीमफॉर्मिंग रेडिओ स्थापित करावे लागतील. यामुळे सिग्नल्स थेट बाणाप्रमाणे वापरकर्त्यांच्या उपकरणांपर्यंत पोहोचू शकतील. याव्यतिरिक्त, डेटा अपलोडची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी नवीन प्रणालींची आवश्यकता असेल.

» 5G स्टँडअलोन कोअरचे प्रमुख आव्हान : 6G मधील आव्हान केवळ महागडे हार्डवेअर नाही. या नेटवर्कचा पूर्णपणे वापर करण्यासाठी नेटवर्कचा सॉफ्टवेअर ब्रेन, म्हणजेच 5G स्टँडअलोन (SA) कोअर, अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतात याची हळूहळू अंमलबजावणी होत असली तरी, अनेक युरोपीय देशांमधील कंपन्या अजूनही 4G नेटवर्क वापरून 5G चालवत आहेत. त्यामुळे, ज्या कंपन्या 5G स्टँडअलोन कोअरमध्ये अपग्रेड करणार नाहीत, त्यांना 6G मध्ये संक्रमण करणे अशक्य जाईल. केवळ सॉफ्ट-लेयर अपग्रेडद्वारे 6G अपग्रेड करण्याचे स्वप्न भंगू शकते.

# पॅन कार्डवर बदलायचा आहे फोटो किंवा सही? फक्त 107 रुपयांत घरबसल्या करा अपडेट, कसे ते जाणून घ्या...

**अनेकदा सरकारी कागदपत्रांवरील फोटो चांगले दिसत नाहीत. पॅन कार्डही याला अपवाद नाही. तुमची इच्छा असल्यास तुम्ही तुमच्या पॅन कार्डवरील फोटो किंवा सही फोनवरून सहजपणे अपडेट करू शकता. यासाठी तुम्हाला एकूण १०७ रुपये खर्च येईल, पण यानंतर तुम्हाला तुमच्या पॅन कार्डवरील फोटो इतरांपासून लपवण्याची कधीही गरज भासणार नाही. कार्डवरील तुमची सही चुकीची असली किंवा अपडेट केली असली तरी, तुम्ही ऑनलाइन सर्व्हिसद्वारे पॅन कार्डवर सही अपडेट करू शकता.**

### ही कागदपत्रे तयार ठेवा

तुमच्या पॅन कार्डवरील फोटो किंवा सही अपडेट करण्यासाठी, तुम्हाला काही विशिष्ट कागदपत्रे तयार ठेवावी लागतील. ओळखीचा पुरावा म्हणून तुम्हाला तुमचा आधार किंवा ड्रायव्हिंग लायसन्स लागेल. एक नवीन पासपोर्ट-आकाराचा फोटो तयार ठेवा. तुमच्या नवीन सहीचा किंवा ऑटोग्राफचा एक स्पष्ट फोटो तयार ठेवा. तुमच्या आधारशी जोडलेला फोन नंबर जवळ ठेवा. कारण तुम्हाला शेवटी तुमचा आधार नंबर टाकावा लागेल आणि तुम्हाला त्या नंबरवर एक ओटीपी मिळेल.



### पॅन कार्ड कसे अपडेट करावे?

सर्वप्रथम, NSDL PAN शोधा आणि अधिकृत वेबसाइटला भेट द्या. होमपेजवर Apply Online विभागात Changes or Correction in Existing PAN Data निवडा. Category अंतर्गत Individual निवडा. तुमची मूलभूत माहिती, जसे की नाव, जन्मतारीख (DOB) इत्यादी प्रविष्ट करा आणि Submit वर क्लिक करा. एक टोकन क्रमांक तयार होईल. तो नोंदवून घ्या आणि Continue with PAN Application Form वर क्लिक करा. आता Submit scanned images through e-Sign वर क्लिक करा. तुम्हाला नवीन कार्ड देखील हवे असल्यास Wether a physical PAN card is required? या प्रश्नासाठी Yes निवडा. खाली स्क्रोल करा आणि तुमच्या पालकांचा तपशील प्रविष्ट करा. तुम्हाला पॅन कार्डवर कोणाचे नाव नोंदवायचे आहे ते निवडा आणि Next वर क्लिक करा. आता तुमचे ओळखपत्र निवडा आणि वेबसाइटवर दिलेल्या आकार आणि फॉरमॅटनुसार तुमचा नवीन फोटो आणि सही अपलोड करा. फॉर्म पूर्ण भरल्यानंतर १०७ रुपये शुल्क भरा. पेमेंट पूर्ण झाल्यावर तुमचा आधार क्रमांक आणि तुमच्या मोबाईलवर आलेला OTP प्रविष्ट करा. एकदा OTP प्रमाणित झाल्यावर, तुम्हाला पोचपावती मिळेल.




### या गोष्टी लक्षात ठेवा...

तुमचे पॅन कार्ड अपडेट करताना, काही गोष्टी नक्की लक्षात ठेवा. सर्वप्रथम, तुमचा फोटो आणि सही अपलोड करताना वेबसाइटवर नमूद केलेल्या आकारात आणि फॉरमॅटमध्ये कागदपत्रे तयार ठेवा. फॉर्म भरताना, तुमचा सक्रिय ईमेल आयडी द्या, जेणेकरून तुम्हाला तुमच्या डिजिटल पॅन कार्डबद्दल अचूक माहिती आणि स्टेटस ट्रॅकिंग मिळू शकेल. तुमचा मोबाईल नंबर तुमच्या आधार कार्डशी जोडलेला ठेवा. कारण पेमेंट केल्यानंतर, तुम्हाला तुमचा आधार क्रमांक प्रविष्ट करावा लागेल आणि तुमच्या आधारशी जोडलेल्या नंबरवर पाठवलेला OTP प्राप्त करावा लागेल.


# फक्त गाणे ऐकणेच नव्हे तर 'इअरफोन'ने करता येतात 6 गोष्टी!

**बहुतेक लोक इअरफोन फक्त संगीत ऐकण्यासाठी किंवा व्हिडिओ पाहण्यासाठी वापरतात, परंतु आजचे प्रगत इअरफोन यापुरते मर्यादित नाहीत. तुम्ही तुमच्या इअरबड्सद्वारे इतर सहा कार्ये करू शकता. यामध्ये कॅमेरा शटर बटण म्हणून वापरण्यापासून ते व्यावसायिक मायक्रोफोन म्हणून वापरण्यापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश आहे. या उपयोगांबद्दल जाणून घेतल्याने तुम्हाला तुमचे इअरबड्स आणखी चांगल्या आणि सर्जनशील मार्गांनी वापरण्यास मदत होईल.**

» इअरफोनद्वारे कॅमेरा नियंत्रित करा : कधीकधी आपल्याला दूरवरून आपल्या फोनचा कॅमेरा नियंत्रित करण्याची गरज असते आणि मदतीसाठी कोणीही उपलब्ध नसते. अशा परिस्थितीत तुम्ही तुमचे इअरफोन्स कॅमेरा कंट्रोल बटण म्हणून वापरू शकता. बऱ्याच इअरबड्समध्ये हे वैशिष्ट्य अंगभूत असते, तर काहींमध्ये प्ले स्टोअरवर उपलब्ध असलेल्या कॅमेरा शटर बटण ॲप्सचा वापर करता येतो. बड्सवरील प्ले-पॉज बटण दाबल्याने तुम्हाला फोन कॅमेऱ्याने फोटो काढता येतात आणि व्हिडिओ मोडमध्ये व्हिडिओ रेकॉर्ड व पॉज करता येतो.

» माइक म्हणून वापरा... : जर तुम्ही कंटेंट क्रिएटर असाल आणि तुम्हाला मायक्रोफोनची गरज असेल, तर तुम्ही तुमचे इअरफोन्स मायक्रोफोन म्हणूनही वापरू शकता. तुम्ही एक इअरबड तुमच्या कॉलरला क्लिप करू शकता किंवा त्याला एका काठीला जोडून हँडहेल्ड मायक्रोफोन तयार करू शकता. ही युक्ती वायर्ड आणि वायरलेस दोन्ही प्रकारच्या इअरफोन्ससोबत काम करते.

» ANC सह लक्ष केंद्रित करा : आजकाल अगदी स्वस्त इअरफोन्समध्येही ANC म्हणजेच ॲक्टिव्ह नॉइज कॅन्सलेशन (Active Noise Cancellation) असते. हे वैशिष्ट्य केवळ संगीताची गुणवत्ताच सुधारत नाही, तर जेव्हा तुम्हाला एकांत हवा असतो तेव्हा लक्ष केंद्रित करण्यासही मदत करते. तुम्हाला फक्त ANC चालू



करून बड्स कानात घालायचे आहेत. यानंतर, तुमच्या आणि तुमच्या कामाच्या मध्ये कोणताही आवाज येऊ शकत नाही.

» तुमच्या आरोग्याचा मागोवा घ्या : जरी हे केवळ विशेष सेन्सर्स असलेल्या इअरफोन्सद्वारेच केले जाऊ शकते, तरी ते तुम्हाला तुमची पावले आणि हृदयाच्या आरोग्याचा मागोवा घेण्यासही मदत करू शकतात. काही इअरबड्समध्ये श्रवण तपासणीचे वैशिष्ट्य देखील असते, जे तुम्ही तुमच्या डॉक्टरांना दाखवू शकता. हे इअरबड्समध्ये बसवलेल्या प्रगत सेन्सर्सच्या मदतीने साध्य केले जाते, जे प्रीमियम इअरबड्स किंवा हेडफोन्समध्ये आढळणाऱ्या सेन्सर्ससारखेच असतात.

» तुमच्या इअरबड्सना थेट अनुवादकामध्ये बदला : तुम्ही तुमचे इअरबड्स थेट अनुवादकासारखे देखील वापरू शकता. तुम्ही तुमच्या आयफोनमधील अंगभूत ॲपल ट्रान्सलेट ॲप वापरू शकता. हे करण्यासाठी, तुमच्या आयफोनवर ट्रान्सलेट ॲप उघडा, 'कन्व्हर्सेशन'वर टॅप करा, तुमची आणि समोरच्या व्यक्तीची भाषा निवडा, मायक्रोफोन चालू करा आणि तुमच्या इअरफोनद्वारे भाषांतर ऐका. त्याचप्रमाणे, अँड्रॉइडवर गूगल ट्रान्सलेट ॲप उघडा, तुमची आणि समोरच्या व्यक्तीची भाषा सेट करा, 'कन्व्हर्सेशन मोड' चालू करा आणि तुमच्या इअरफोनद्वारे थेट भाषांतर ऐका.

### गुप्तहेर किंवा गुप्त उपकरण

» तुम्ही तुमच्या पाठीमागे होणारी संभाषणे ऐकण्यासाठी तुमच्या इअरबड्सचा वापर देखील करू शकता. हे आयफोन आणि अँड्रॉइड फोन दोन्हीवर काम करते. हे करण्यासाठी तुम्हाला तुमच्या फोनच्या ॲक्सेसिबिलिटी सेटिंग्जचा वापर करावा लागेल. हे करण्यासाठी, तुम्ही खालीलप्रमाणे करू शकता:

» आयफोनवर : सेटिंग्ज » कंट्रोल सेंटरवर जा आणि 'हिअरिंग' नावाचे फीचर जोडा. त्यानंतर, कंट्रोल सेंटरमध्ये, 'लाइव्ह लिसन' चालू करा. आता, तुम्ही तुमचा फोन कुठेही ठेवून तुमच्या इअरफोन्सच्या आसपास होणारी संभाषणे स्पष्टपणे ऐकू शकता.

» अँड्रॉइड फोनवर : सेटिंग्ज » ॲक्सेसिबिलिटीवर जा आणि साउंड ॲम्प्लिफायर किंवा हिअरिंग एन्हान्समेंट्स चालू करा. त्यानंतर तुम्हाला जिथे ऐकायचे आहे तिथे तुमचा फोन ठेवा आणि ती संभाषणे तुमच्या इअरफोन्समध्ये सहजपणे ऐका.

## Change In Name

My old name is **Salim Tausif Mohammed Jilani** which now i am changing as new name **Salim Tausif Jilani Pardeshi** Henceforth my all correspondence will be done as per my new name please consider the same.

**Address - Ghar No 14-210 Noble Urdu School Labour Colony Nanded 431601**

## Change In Name

My old name is **Mohammed Jilani** which now i am changing as new name **Jilani Mohammad Sultan Pardeshi** Henceforth my all correspondence will be done as per my new name please consider the same.

**Address - Ghar No 14-210 Noble Urdu school Labour Colony Nanded 431602**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## चौकशीची जाहिर नोटीस

**अर्ज क्रमांक ७७०/२०२६ कलम १९**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : गती फाउंडेशन कोपरा**
**ता. किनवट जि. नांदेड**

अर्जदार नाव : कोंडबा मारोती वलकुलवाड.

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमूद केलेल्या अहवाल अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमूद केलेला सार्वजनिक न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय? अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्याकडे सभासद फी रुपये ३५००/- जमा आहेत. ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाच्या निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझ्या सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १२/०५/२०२६ रोजी दिली.

(श्रीरामे वि. एन.)
वरिष्ठ लिपिक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

(वि. जि. गंगावणे)
(अधीक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

## टी.सी. हरवली

माझी प्रणित सिद्धार्थ कांबळे या नावाची, पंडितराव देशमुख प्राथमीक शाळा हदगांव येथून काढलेली चौथी पासची टीसी व मार्कमेमो हदगांव नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणाला संपल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी.

**पत्ता**
**प्रणीत सिद्धार्थ कांबळे रा. गौतम नगर हदगांव ता. हदगांव जि. नांदेड**
**मो.नं. ९१४६१६७०५१**

## टी.सी. हरवली

संगम राजेंद्र आढाव मी कंधार नांदेड बसने प्रवास करीत असताना माझी दहावी पास ची टी सी मार्क मेमो जातीचे प्रमाणपत्र व इतर महत्त्वाचे कागदपत्र हरवले आहेत. कुणाला मिळाल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**- संपर्क -**
**संगम राजेंद्र आढाव**
**हल्ली मुक्काम आंबेडकर नगर**
**लोहा तालुका लोहा जिल्हा नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी सुनिता विठ्ठल सब्बनवार रा. घुंगराळा ता.नायगाव जि. नांदेड या नावाची १० वी पासची टी. सी. घुंगराळा ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

**संपर्क पत्ता - सुनिता विठ्ठल सब्बनवार रा. घुंगराळा ता. नायगाव खै नांदेड जि. नांदेड**
**मो. ९९७५८१६९९१**

## टी.सी. हरवली

माझी कल्याणी शंकरराव देशमुख या नावाची बारावी विज्ञान पासची टी.सी. बरबडा ते नांदेड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क मोबाईल**
**कल्याण शंकरराव देशमुख**
**मो.नं. ९४०२१२७३४७**

## Change In Name

My old name is **MOHAMMED SAJID** which is now i am changing New name **SAJID RAFIQUE SHAIKH.** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.

Address :-1-2-136 NEAR RAILWAY STATION MADINA NAGAR, MUDKHED, NANDED, MAHARASHTRA 431806 Mo. No 7020506071

## Change In Name

My old name is **VANIA MAHWISH SAMEERUDDIN MOMIN** which now i am changing as new name **VANIA MAHWISH SAMEERUDDIN** Henceforth my all correspondence will be done as per my new name please consider the same.

Address - 9-4-236 KHAYYUM COMPLEX DEGLOOR NAKA,NEAR BSNL OFFICE, POST ITWARA NANDED, 431604 M.No.-8149955571

## Change In Name

My old name is **SAMEERUDDIN MOMIN** which now i am changing as new name **SAMEERUDDIN** Henceforth my all correspondence will be done as per my new name please consider the same.

Address - 9-2-364 Bilal Nagar, Degloor Naka Itwara Nanded, 431604 M.No.-8149955571

## Change In Name

My old name is **BANU BEE** which now I am Changing as new Name. **BANU BI.** Hence forth my all correspondence Will be done as pes my new name. Please consider, the same.

Address - H.No. 9-6-919, Khusro Nagar, Near Golden Bekery, Itwara Nanded 431604 Mo.No. 7038982003

## Change In Name

My old name is **ANANTWAR PRATIKSHA CHENNAPPA** which now I am Changing as new Name. **ANANTWAR PRATIKSHA CHENAPPA.** Hence forth my all correspondence Will be done as pes my new name. Please consider, the same.

Address - Chaufala, Shivji Chowk, Itwara Nanded Maharashtra

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यांत येते की, मौजे अण्णारावपेठ ता.किनवट जि.नांदेड येथील शेतजमिन शेत गट क्रं. 597 क्षेत्रफळ 19 आर, पोटखराब 01 आर, आकार 3 रुपये 07 पैसे, शेत गट क्रं. 598 क्षेत्रफळ 16 आर, पोटखराब 03 आर, आकार 2 रुपये 60 पैसे, शेत गट क्रं. 599 क्षेत्रफळ 17 आर, पोटखराब 03 आर, आकार 2 रुपये 76 पैसे ज्याची एकत्रित चतु:सिमा पुर्वेस - विजयाबाई भंडारे चे शेत, पश्चिमेस - पिटला नारायण व लोका भुमारेड्डी यांचे शेत, उत्तरेस - गावठाण व दक्षिणेस - लोका भुमारेड्डी (मधवा) यांचे शेत ह्या शेतजमिनीचे मालक विमलबाई लक्ष्मण सावते रा.अप्पारावपेठ ह्या असुन ह्यांचेकडुन मी सौदा चिठ्ठी आधारे सदर शेतजमिन खरेदी करण्यांचा करार केलेला असुन, सौदा चिठ्ठी आधारे सौदा रक्कम त्यांना अदा करण्यांत आलेली आहे व लवकरच वरील जमिनीचे खरेदी खत माझ्या हक्कात करुन घेणार आहे.

सदर जमिनीबाबत कोणाचा कांही हितसंबंध, अधिकार असेल वा वरील व्यवहारास कोणाचा कांही आक्षेप असेल तर तो आक्षेप आपण योग्य त्या दस्तासह सदर प्रगटन प्रकाशीत झाले पासुन आठ दिवसाचे आत ताबडतोब येवुन आमचेकडे नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपास कुठलाही अर्थ राहणार नाही व ठरल्याप्रमाणे आम्ही रक्कम देवुन खरेदी खत करुन घेणार आहो. करीता हे जाहिर प्रगटन.

दिनांक :- 17.06.2026

जाहिर प्रगटन देणार
भुपतीरेड्डी मल्लारेड्डी नुतुल
रा.अप्पारावपेठ ता.किनवट
हा.मु.निर्मल
मो.नं. 9849225818

## वसतिगृहात प्रवेश देणे चालू आहे

श्री संत तुकडोजी महाराज आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ संस्था खेरडा
ता. किनवट जि. नांदेड

१. गोंडवना आदिवासी विद्यार्थी वसतिगृह गोकुंदा
मान्यं संख्या :- ३६
२. महात्मा फुले विद्यार्थी वसतिगृह गोकुंदा
मान्यं संख्या :- ३०

सन २०२६-२०२७ या शैक्षिणिक वर्षाकरीता इयत्ता ५ ते १० वी च्या विद्यार्थ्यांना खालील विहीत टक्केवारी नुसार प्रवेश देणे चालू आहे.

| एस.सी. | एस.टी. | व्हीजेएनटी | एस.बी.सी. | ओबीसी / ओपन |
|---|---|---|---|---|
| ६७ टक्के | १४ टक्के | १७ टक्के | ०२ टक्के | २० टक्के |

### वसतिगृहात प्रवेशासाठी लागणारे कागद पत्र

१. टिसीची झेराक्सा प्रत /
२. किंवा शाळेचा बोनाफाईड
३. मार्कलिस्टा
४. रहिवासी प्रमाणपत्र
५. जातीचे प्रमाणपत्र
६. उत्पनाचा दाखला
७. आधारकार्ड मुलाचे व पालकाचे
८. फोटो २
९. मागासवर्गीय विद्यर्थ्यांना प्राधान्यं

प्रवेश २५ जून पर्यंत चालू राहील

संपर्क पत्ता
अध्यक्ष / अधिक्षक
गोंडवना व महात्मा फुले विद्यार्थी वसतिगृह गोकुंदा
मो. न. ९८८१३६९५३५/ ७४९८२४५९३५

## श्री साई मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह गोविंदराज सिटी किनवट

ता.किनवट जि. नांदेड

**प्रवेश देणे चालु आहे**

( सन 2026 - 2027 या वर्षा करीता )

5 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी श्री साईबाबा शिक्षण समिती प्रसारक मंडळ जलधरा व्दारा संचलीत श्री साई मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह गोविंदराज सिटी किनवट या वसतीगृहात गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना सन 2026 - 2027 या शैक्षणिक वर्षासाठी जाती निहाय विहीत टक्केवारी नुसार प्रवेश देणे चालु आहे.

| अनु.जाती एस. सी. | अनु. जमाती एस. टी. | वि. जा. भ. ज. व्हि. जे. एन. टी | विशेष मागासप्रवर्ग एस. बी. सी. | | इतर मागासवर्गीय ओ. बी. सी. | बिगर मागास प्रवर्ग ( खुला ) |
|---|---|---|---|---|---|---|
| 67% | 14% | 17% | 2% | 100% | 15% | 05% |

**वसतीगृहाची वैशिष्ट्ये**

1) प्रशस्त ईमारत
2) खेळाचे मैदान
3) मुबलक पाण्याची सोय
4) जेवनाची व रहाण्याची उत्तम व्यवस्था
5) विद्यार्थ्यांकडे व्यक्तीगत लक्ष
6) सुसज्ज ग्रंथालय
7) निसर्गरम्य वातावरण
8) नियमित अभ्यास
9) लाईटची व्यवस्था
10) दररोज योगासने व व्यायाम
11) विशेष मार्गदर्शन

गरजु व गरीब विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा आवश्य लाभ घ्यावा.

संपर्क पत्ता
संचालक / अधिक्षक
श्री साई मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह गोविंदराज सिटी किनवट ता किनवट जि नांदेड
मोबाईल क्रमांक :- 9579436465 / 8275283845

## वसतिगृहात प्रवेश देणे चालू आहे

आदिवासी सेवा संघ किनवट संचलित
ता. किनवट जि. नांदेड

१ श्री फेरसापेन आदिवासी वसतिगृह किनवट मान्यं संख्या :- ३०
२ आदिवासी जनता वसतिगृह किनवट मान्यं संख्या :- ३६
३ देवदेवेश्वरी जंगोभारती मुलींचे वसतिगृह किनवट :- ३०

सन २०२६-२०२७ या शैक्षिणिक वर्षाकरीता इयत्ता ५ ते १० वी च्या विद्यार्थ्यांना खालील विहीत टक्केवारी नुसार प्रवेश देणे चालू आहे.

| एस.सी. | एस.टी. | व्हीजेएनटी | एस.बी.सी. | ओबीसी / ओपन |
|---|---|---|---|---|
| ६७ टक्के | १४ टक्के | १७ टक्के | ०२ टक्के | २० टक्के |

वसतिगृहाची वैशिटये

१ प्रशस्तं इमारत
२ राहण्याची व जेवणाचीउत्म व्यवस्था
३ विशेष मार्गदर्शन
४ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्राधान्यं
५ इयत्ता ५ वी ते १० वी सर्व विषयाच्या टयुशनची व्यवस्था
६ प्रवेश घेताना आधारकार्ड, गुणपत्रक आवश्यक असेल.

प्रवेश २५ जून पर्यंत चालू राहील

संपर्क पत्ता
अध्यक्ष / सचिव / अधिक्षक
आदिवासी सेवा संघ किनवट
मो. न. ७८८७३९०१०५ व ९७६७११४३२३

Shri Gurudatta Pratishthan Nanded's

## NANDED RURAL DENTAL COLLEGE & RESEARCH CENTER

Pangri Village, behind SRTM University, Nanded - 431 606.
Contact: 9860275412. E-mail: nrdcrcn@gmail.com

Application are invited, in the prescribed format, from the eligible candidates for the following posts.

**Professor, Reader, Sr. Lecturer, Lecturer, Tutor**

Requisite Qualification, Experience, Other details and prescribed application format are available on College website: www.nrdcrcn.com

Last date of application is 29/06/2026

**Principal**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितास या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की माडो खालील प्रमाणे जाहीर पक्षकार कोमल पि. रंगनाथ पवार वय २९ वर्ष धंदा नौकरी रा. मारोती मंदिरा जवळ, अर्धापुर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खरेदीखताआधारे श्री रमेश पि. रामराव धात्रक रा. शेनी ता. अर्धापूर जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील अर्धापूर येथील एक प्लॉट ज्याचा ग्रामपंचायत मिळकत क्र.४८१/६४ आहे. ज्याची एकुण लांबी उत्तर-दक्षिण ३० फुट म्हणजे ९.१४ मी. आहे व रुंदी पुर्व-पश्चिम ५० फुट म्हणजे १५.२४ मी. आहे. ज्याची एकुण क्षेत्रफळ १५०० चौ.फुट म्हणजे १३९.४० चौ.मी. आहे ज्याची चर्तु:सिमा खालील प्रमाणे आहे-

पुर्वेस - १५ फुट रुंदीचा रस्ता आहे.
पश्चिमेस - शिवाजी निमगावकर यांचे घर आहे.
दक्षिणेस - १५ फुट रुंदीचा रस्ता आहे.
उत्तरेस - आनंदराव कारलेकर यांची मोकळी जागा आहे

वरील वर्णनाचा प्लॉट नोंदणीकृत विक्रीखत दस्त क्र. १९२०/२० दिनांक ०८.१२.२०२० प्रमाणे सदरील प्लॉट माझ्या पक्षकाराने खरेदी केलेला आहे.

सदरील प्लॉटची लिंक रजिस्ट्री ही रमेश पि. रामराव धात्रक रा. शेनी ता. अर्धापूर जि. नांदेड यांच्या नावे असलेली मुळ लिंक रजिस्ट्री ज्याचा नोंदणीकृत विक्रीखत क्र.१३९/२००९ दिनांक ०६.०२.२००९ ही लिंक रजिस्ट्रीची मुळ प्रत दिनांक ०६.०६.२०२६ रोजी माझे पक्षकार नांदेड ते अर्धापूर बसने प्रवास करीत असतांना गहाळ झाली आहे. त्याबाबत माझ्या पक्षकाराने सदरील लिंक रजिस्ट्रीची मुळ प्रत मिळावी म्हणून खुप शोधशोध केली असतांना सुध्दा ती सापडून आली नाही. सदरील लिंक रजिस्ट्रीची मुळ प्रत माझ्या पक्षकाराला शुभम हाऊसिंग फायनान्स कंपनीकडून गृह कर्ज घेण्यासाठी नितांत आवश्यकता आहे. तरी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, माझ्या वरील लिंक रजिस्ट्रीची मुळ प्रत कोणास सापडल्यास ७ दिवयसांच्या आत खाली दिलेल्या पत्यावर आणुन द्यावी किंवा संपर्क करावा. त्यांना योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

करीता जाहीर प्रगटन

मार्फत
अॅड एच.बी. नरंगले
नांदेड
मो. ९८९०८४५६५५

नोटीस देणार
कोमल पि. रंगनाथ पवार
रा. मारोती मंदिरा जवळ अर्धापूर,
ता. अर्धापूर जि. नांदेड मो.
नं.८६०५३३०१२४

पंजीयन.क्र.एन.एन.डी/बी.एन. के./ ११५-७४../ दिनांक १०.०६.१९७४

## वीज कामगार को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड

Email ID: socetyveejkamgaryahoo.in मो.न. (७८७५९६४२२२)

**व्ही.आय.पी. रोड महादेव दालमील च्या बाजूला नवीन मोढा नांदेड .**

जा.क्र./ वीकासो / २०२६-२७/४६९ दि. १८/०६/२०२६.

### पाहिजेत

| अ.क्र | पदनाम | संख्या |
|---|---|---|
| १ | कार्यालयीन अधिक्षक | ०१ |
| २ | कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक | ०२ |

**शैक्षणिक पात्रता :** अ.क्र. ०१ (कार्यालयीन अधिक्षक) बि.कॉम / एम. कॉम / एम.बी.ए. (वित्त व लेखा) जी.डी.सी ए, डी.सी.एम आवश्यक) वेतन: प्रथम वर्ष रु. १५०००/- दुसरे वर्ष रु. १७०००/- तिसरे वर्ष रु. १९०००/- अ.क्र. ०२ (कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक) बि.कॉम / डी.सी.एम आवश्यक ) वेतन: प्रथम वर्ष रु. १२०००/- दुसरे वर्ष रु. १४०००/- तिसरे वर्ष रु. १६०००/- अतिरिक्त शैक्षणिक पात्रता: MSCIT, Tally, इंग्रजी व मराठी ३०-४० (प्रती मिनिट)

**वय :** अ.क्र ०१ (कार्यालयीन अधिक्षक) २५ ते ४५ वर्षापर्यंतः अ.क्र. ०२ (कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक) २५ ते ३५ वर्षापर्यंत.

**अनुभव :** अ.क्र. ०१ (कार्यालयीन अधिक्षक) का.अ. या पदावर सहकारी पतसंस्थेत किंवा बैंक क्षेत्रात कमीत कमी तीन (०३) वर्षाचा अनुभव. अ.क्र. ०२ (कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक लिपिक या पदावर सहकारी पतसंस्थेत अनुभव असल्यास प्राधान्य.

उपरोक्त दोन्हीहि पदासाठी जास्त अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**अतिरिक्त माहिती :**

१) उपरोक्त दोन्ही पदासाठी निवड हि ०३ वर्षे कंत्राटी पद्धतीने राहील. कर्मचारी यांचे काम समाधानकारक असेल तर कायम करण्यात येईल. काम असमाधानकारक असल्यास त्याची सेवा खंडित करण्यात येईल. हे सर्व अधिकार संचालक मंडळास राहातील. २) विहित नमुना अर्जाचा शुल्क १००/- रु भरणा करून संस्थेच्या कार्यालयातुन घेण्यात यावा. ३) भरती बाबतचे सर्व अधिकार हे संचालक मंडळ व निवड समितीकडे राखीव राहतील. ४) भरलेला फॉर्म व सर्व कागदपत्रासह संस्थेच्या कार्यालयात दि. ०५/०७/२०२६. पर्यंत दाखल करण्यात यावे. दि. ०५/०७/२०२६. या तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**मानदसचिव**
**वीज कामगार को ऑप क्रेडीट सोसायटी लि., नांदेड**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह

**कंधार ता. कंधार जि. नांदेड**

## प्रवेश देणे चालू आहे

सन २०२६-२७ साठी या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देणे चालू आहे. वरील वसतिगृहास मोफत प्रवेश, सुसज्ज इमारत, नाष्टा व जेवणाची उत्तम सोय तसेच आंथरून, पांघरून, प्लेट व पेट्यांची उत्तम सोय.

(वसतिगृहास 'अ' दर्जा प्राप्त झालेला आहे)

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | भटक्या विमुक्त जमाती | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग (ओ.बी.सी.) | १५ टक्के |
| ६ | खुला प्रवर्ग (ओपन) | ५ टक्के |

दि. १५ जून २०२६ पासून प्रवेश देणे चालू आहे. प्रवेश घेण्याची अंतिम तारीख ३० जून २०२६ पर्यंत राहिल. आरक्षणाप्रमाणे विद्यार्थी न मिळाल्यास इतर जातीच्या विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**अध्यक्ष** **अधिक्षक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह कंधार ता. कंधार जि. नांदेड**

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# ‘एफडीए’च्या कारवाईत दहा लाखांचा गुटखा जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)** –अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात सर्वत्र भेसळयुक्त, अवैध, अनधिकृतरीत्या साठा करणे, आरोग्याला अपायकारक अन्नपदार्थ विकणे आदी बाबींविरुध्द कारवाईची मोहीम सुरू आहे. त्यांच्याच आदेशाने नांदेडमध्ये एफडीएने दोन दिवसांपूर्वी एका औषध पेढीवर कारवाई करून सील केली, तर गुरुवारी रात्री जुन्या नांदेड भागातील पैलवान टी हाऊस येथे एका ठिकाणी कारवाई करून दहा लाख रुपयांचा अवैध गुटखा जप्त केला आहे. गुटखा साठा करणारा आणि विक्री करणाऱ्याविरुद्ध इतवारा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार गुप्त माहितीच्या आधारे गुरुवारी नांदेड शहरातील इतवारा परिसरातील पैलवान टी हाऊसजवळ असलेल्या मे. गोल्डन जर्दा स्टोअर्स या दुकानावर छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान रजनीगंधा पानमसाला, विमल पानमसाला, राजनिवास सुगंधित पानमसाला, सागर पानमसाला, मुसाफिर पानमसाला, गोवा १०००, आरएमडी पानमसाला, व्हीवन च्युइंग टोबॅको, मिराज जाफरानी जर्दा, वजीर गुटखा, एम स्टैंडर्ड टोबॅको, सिग्नेचर पानमसाला आदी ३४ प्रकारच्या प्रतिबंधित पदार्थांचा साठा आढळून आला. एकूण जप्त मालाची किंमत ९ लाख ८६ हजार १७ रुपये इतकी आहे. या प्रकरणी विक्रेता व पुरवठादार अशा दोन व्यक्तींविरुद्ध इतवारा पोलीस ठाण्यात दि.१९ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी अमृता दुधाटे, अरुण तम्मडवार, अ. नं. गिरी, शिल्पा श्रीरामे, तुषार घोपे, कृष्णा मुळे आणि वैभव ठोंबरे यांच्या पथकाने सहायक आयुक्त रा. मा. भरकड व अनंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

# ‘एलसीबी’च्या पथकाकडून हिमायतनगरात सव्वाअकरा लाखांचा गुटखा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या ‘ऑपरेशन क्रॅकडाऊन’ मोहिमेअंतर्गत हिमायतनगर शहरात स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) नांदेड व अन्न व औषध प्रशासनाच्या संयुक्त पथकाने बुधवार, दि. १७ जून रोजी मोठी कारवाई केली. प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित जर्दा व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार असा ११ लाख १५ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



हिमायतनगर शहरातील हजरत उमर चौक, वेस्ट कॉलनी परिसरात एका चारचाकी वाहनातून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटख्याची विक्री होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे, अन्न सुरक्षा अधिकारी अमृता दुधाटे तसेच एलसीबीच्या पथकाने सापळा रचून कारवाई केली. या कारवाई दरम्यान (एमएच-४८ एफ-०७०८) क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायर कारची तपासणी करण्यात आली. तेव्हा या तपासणीमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला, सुगंधित जर्दा, तंबाखूजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणात आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी वाहनासह संपूर्ण मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी शेरखान मुसाखान पठाण (वय ३२ रा. संभाजीनगर तामसा ता. हदगाव, सध्या वेस्ट कॉलनी, हिमायतनगर) आणि शाहरुखखान मुसाखान पठाण (वय २८, रा. संभाजीनगर, तामसा, ता. हदगाव) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत संबंधित गुटखा व पानमसाला मुधोळ या ठिकाणाहून खरेदी केल्याची माहिती समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, सुगंधित जर्दा, तंबाखूजन्य पदार्थ तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली स्विफ्ट डिझायर कार यांचा समावेश असून, एकूण किंमत ११ लाख १५ हजार ६४० रुपये मुद्देमालाचा समावेश आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे, अन्न सुरक्षा अधिकारी अमृता दुधाटे तसेच एलसीबीच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

## स्मार्ट मीटरच्या संदर्भात शनिवारपासून तीन दिवस जागृती मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड, परभणी आणि हिंगोली या तीनही जिल्ह्यांतील तालुका स्तरावरील महावितरणच्या उपविभागीय कार्यालया-समोर शनिवारपासून पुढील तीन दिवस स्मार्ट मीटरच्या संदर्भात ग्राहकांसाठी जागृती मेळावे घेण्यात येणार आहेत.

नांदेड परिमंडलात तीन लाखांपेक्षा अधिक वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्यात आलेले आहेत. त्या स्मार्ट मीटरधारकांच्या वीज बिलविषयक तक्रारी शून्यावर आलेल्या आहेत.

विजेचे स्मार्ट मीटर हे अत्याधुनिक व स्वयंचलित असून, त्याच्यामार्फत होणाऱ्या सर्व प्रक्रिया मानवी हस्तक्षेपाशिवाय होतात. त्यामुळे ग्राहकांची कुणाकडून फसवणूक होण्याचा धोका नाही. अलीकडे छतावरील सौरऊर्जा निर्मिती अधिक वाढली आहे. त्यामुळेच सौर कालावधीतील वीज वापराची नोंद घेऊन ग्राहकांना त्याबदल्यात सवलत देण्यासाठी स्मार्ट मीटरच आवश्यक आहे. स्मार्ट मीटरशिवाय सौर कालावधीतील वीज वापर दुसऱ्या साधारण मीटरद्वारे मोजणे अशक्य आहे. सौर कालावधीतील विजेचा सवलत दर ८५ पैसे इतका आहे. असे असतानाही ग्राहकांची केवळ दिशाभूल करुन त्यांच्या मनात संभ्रम निर्माण करणारे संदेश सोशल मीडियातून प्रसारित होत आहेत.

स्मार्ट मीटरबाबत असणारे ग्राहकांचे गैरसमज दूर करत शंका-समाधान व जागृतीसाठी ग्राहक मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. ग्राहकांनी मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

## श्री गुरू हरगोविंद साहिब महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



**नांदेड ( प्रतिनिधी)**– शीख धर्माचे सहावे धर्मगुरू श्री हरगोविंद साहिब यांच्या ४३१ व्या जयंतीनिमित्त दि. २५ जून ते ३० जून दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गुरू ग्रंथ साहिबजी, श्रीदसम ग्रंथ साहिब, श्री सरबलोह ग्रंथ साहिबश्री चौपई साहिबचे पाठ होणार आहे. नगरकीर्तनाने कार्यक्रमाचा समारोप होणार आहे, अशी माहिती हजुरी साथ संगत व हजुरी क्रांती सघटनांचे अध्यक्ष मनप्रीतसिंघ कुंजीवाले यांनी दिली आहे.

गुरुद्वाराचे मुख्य जत्थेदार संत बाबा कुलवंतसिंघ, समूह पंजप्यारे साहिब यांच्या आशीर्वादाने व बाबा नरिंदरसिंघ व बाबा बलविंदरसिंघ लंगर साहिब (कार सेवावाले) व माता साहिब देवाजीचे जत्थेदार बाबा तेजासिंघ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरू हरगोविंद साहिब यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सहावे गुरू हरगोविंद साहिब यांची जयंती २४ जून रोजी साजरी करण्यात येत आहे. त्या निमित्ताने फतेहसिंघ मंगल कार्यालय अबचल नगर कॉलनी येथे सात दिवस दररोज कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

दुपारी ३.३० ते ५ वाजेपर्यंत सुखमनी साहिबचा पठण आणि रात्री ८ ते ९ वाजेपर्यंत श्री गुरु हरगोबिंद साहिब यांचे जीवनचरित्र, कथाकार, ज्ञानी सरबजीतसिंग निर्मले आणि ज्ञानी नाहरसिंघ हे सादर करणार आहेत. दररोज कथेच्या नंतर सायंकाळी ९ ते ९.३० पर्यंत नाम सिमरणचे पाठ होणार असून, त्यानंतर लंगर प्रसादाचे आयोजन केले आहे. दि. २५ जून व २६ जून रोजी सकाळी ११ वाजता गतका प्रतियोगिता व दि. २७ जून ते २८ जूनपर्यंत चेस प्रतियोगिताचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३० जून रोजी सप्ताह पाठची समाप्ती होईल. या कार्यक्रमांना सर्व साथ संगतने मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्याकडून अर्धापुरातील तलाव कामाची पाहणी; लवकरच लोकार्पण

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी ‘अमृत-२’ अभियानांतर्गत नगरपंचायत हद्दीत सुरू असलेल्या ऐतिहासिक तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या कामांची खा. अशोकराव चव्हाण यांनी शुक्रवार, दि. १९ जून रोजी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधितांनी लवकरात लवकर कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

‘अमृत-२’ योजनेच्या माध्यमातून अर्धापूर शहरातील तलावाचा कायापालट करण्यात येत असून, तलावाचे सौंदर्यीकरण आणि पुनरुज्जीवन करण्याचे काम वेगात सुरू आहे. खा. अशोकराव चव्हाण यांनी संपूर्ण तलाव फिरून सद्यस्थिती, अस्तरीकरण, बांधण्यात आलेले संरक्षक कठडे, सुशोभित जॉगिंग ट्रॅक, वृक्षारोपण, विद्युत व्यवस्था व तेथे उभारण्यात आलेल्या इतर सार्वजनिक सुविधांची बारकाईने पाहणी केली. नगरपंचायतीचे मुख्याधिकारी जगदीश दळवी यांनी प्रकल्पाच्या



आतापर्यंत झालेल्या प्रगतीची आणि तांत्रिक बाबींची माहिती दिली.

तलावाच्या कामाची प्रगती तसेच खा. अशोकराव चव्हाण यांनी नागरिकांच्या सोयीसाठी या प्रकल्पाचे उर्वरित सर्व काम अत्यंत दर्जेदार पद्धतीने आणि लवकरात लवकर पूर्ण करावे, अशा सूचना मुख्याधिकारी व उपस्थित प्रशासनाला दिल्या आहेत.

या तलाव पुनरुज्जीवनामुळे अर्धापूर शहराच्या वैभवात मोलाची भर पडणार असून, नागरिकांना एक उत्तम फिरण्याचे आणि विरंगुळ्याचे केंद्र उपलब्ध होणार आहे. या पाहणी दौऱ्यावेळी माजी सभापती किशोर स्वामी, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी जगदीश दळवी, नगराध्यक्षा सौ. वैशाली देशमुख, उपनगराध्यक्ष मुक्तेदर खान पठाण, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, चेअरमन प्रवीण देशमुख, उपनराध्यक्ष राजेश्वर शेटे, बाबुराव लंगडे, सोनाजी सरोदे, डॉ. विशाल लंगडे, नगरसेवक गाजी, राजेश्वर देशमुख, नामदेव सरोदे, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरुराज रणखांब, उमाकांत सरोदे यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## देशमुख कोचिंग इन्स्टिट्यूटचा नीट-जेईई-सीईटी ओरिएंटेशन प्रोग्राम



**देगलूर (प्रतिनिधी)** – मेडिकल, इंजिनिअरींग, कृषी, फार्मसी, इत्यादी व्यावसायिक अभ्यास-क्रमांसाठी आवश्यक असलेल्या नीट, जेईई, सीईटी या स्पर्धा परीक्षेच्या फाऊंडेशनची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देशमुख कोचिंग इन्स्टिट्यूटने ओरिएंटेशन प्रोग्राम आयोजित केला आहे.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे माईंड पॉवर ट्रेनर तथा विश्वप्रसिद्ध लाईफ स्किल कोच इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि. २३ जून रोजी सायंकाळी ५ वाजता देशमुख कोचिंग इन्स्टिट्यूटच्या वतीने काद्रेकर हॉस्पिटलजवळील गांधी नगर येथे हा कार्यक्रम होणार आहे. जगप्रसिध्द स्टुडंट-पॅरेंट काऊन्सिलर शिवाजीराजे पाटील यांच्या व्याख्यानाचा परिसरातील विद्यार्थी व पालकांनी लाभ घेण्याचे आवाहन संयोजक प्रा. देशमुख यांनी केले आहे.

## २३ जून रोजी जागतिक ऑलिम्पिक डे रॅलीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –जागतिक क्रीडा महोत्सव ऑलिम्पिकची स्थापना ग्रीस येथे बॅरन पियरे डी कौबर्टिन यांनी केली. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती स्थापना दि. २३ जून, १८९४ साली झाली. पहिल्या आधुनिक ऑलिम्पिकची सुरुवात दि.६ एप्रिल १८९६ रोजी झाली. जगातील सुमारे २०० पेक्षा अधिक देशाचे ऑलिम्पिक संघ हे जागतिक ऑलिम्पिक समिती स्थापनेचा दिवस म्हणून २३ जून रोजी ऑलिम्पिक डे साजरा करतात. त्याचप्रमाणे आपल्या देशाचे भारतीय ऑलिम्पिक संघ व राज्याचे महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन हे सन १९५२ सालापासून ऑलिम्पिक डे व ऑलिम्पिक सप्ताह साजरा करीत आहे. त्यानुषंगाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड, ऑलिम्पिक असोसिएशन नांदेड व नांदेड जिल्हा एकविध खेळ संघटना (सर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन पुढीलप्रमाणे साजरा करण्यात येणार आहे.

जागतिक ऑलिम्पिक डे रॅलीचे आयोजन मंगळवार, दि. २३ जून रोजी सकाळी ७ वा. करण्यात आले आहे. या रॅलीला आयटीआय चौक येथून सुरुवात होणार असून, शिवाजीनगरमार्गे बसस्टँड- कलामंदिर वजिराबाद चौक, छ. शिवाजी महाराज पुतळा आणि जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे रॅलीचा समारोप होणार आहे. जागतिक ऑलंम्पिक डे रॅलीस मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात येणार आहे. याकरिता नांदेड जिल्ह्यातील सर्व शाळेतील खेळाडू मुले-मुली, प्रशिक्षक, विविध क्रीडा संघटनेचे पदाधिकारी, विविध कार्यालयातील शासकीय अधिकारी/कर्मचारी तसेच सर्व नागरिकांना या रॅलीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये मंगळवार, दि. २३ जून रोजी आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक दिनानिमित्त चर्चा सत्र, परिसंवाद, कार्यशाळा तसेच विविध गुणवंत खेळाडूंचा सत्कार व शाळास्तरावर विविध खेळाचे आयोजन करुन साजरा करावा, असेही आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

## सुमनबाई डुब्बेवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –बिलोली तालुक्यातील आदमपूर येथील रहिवाशी सुमनबाई गंगाधर डुब्बेवार यांचे शुक्रवार, दि. १९ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि.२० जून रोजी सकाळी १० वाजता आदमपुरात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई, सात नातवंडे असा परिवार आहे. बालाजी डुब्बेवार, उद्योजक गणेश डुब्बेवार सावकार यांच्या त्या आई होत.

# ग्राम स्वच्छतेसाठी माळाकोळीत युवकांचा पुढाकार

**लोहा (प्रतिनिधी)** –माळाकोळी येथील युवकांनी पुढाकार घेत गावात स्वच्छता मोहीम राबवून एक आदर्श निर्माण केला आहे.

माळाकोळी ग्रामपंचायतीच्या कारभाराला कंटाळून माळाकोळी गावातील युवकांनी स्वतः नाल्या स्वच्छ करून परिसरातील नागरिकांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. गावातील सांडपाणी, तुंबलेल्या नाल्या व अस्वच्छतेबाबत वारंवार ग्रामपंचायत सदस्य, सरपंच तसेच ग्रामपंचायत कार्यालयाला निवेदनाद्वारे माहिती देऊनही ग्रामपंचायत प्रशासनाकडून निधी उपलब्ध नाही असे उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. जर ग्रामपंचायतीकडे निधीच नव्हता, तर १४ वा व १५ वा वित्त आयोग, मनरेगा आणि इतर विकास योजनांमधून प्राप्त झालेला लाखो रुपयांचा निधी नेमका गेला कुठे? हा प्रश्न आता गावातील युवक आणि नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाने गावाचा कारभार पारदर्शक ठेवण्याऐवजी माहिती लपविण्याची भूमिका घेतल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने विकासकामांवर झालेला खर्च, प्राप्त निधी आणि त्याचा



वापर याचा संपूर्ण हिशोब ग्रामसभा व गावकऱ्यांसमोर जाहीर करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

यावेळी पाटील भालेराव, रितेश केंद्रे, ऋतिक जोंधळे, संदीप मस्के, सचिन होनमोडे, ओम साखरे, शिवा मुस्तापुरे,आदर्श भालेराव, मंगेश मुसळे, सचिन मुंडे, आशिष मुस्तापुरे, तुषार कुलकर्णी, ऋषी मुस्तापुरे, अनिकेत मंगनाळे, अक्षय सांगळे, विजय भालेराव, सुशांत लव्हारे, श्रीकांत केंद्रे, अजय तिडके, विजय तिडके, गोविंद केंद्रे, सूर्या केंद्रे, धनंजय तिडके, सोहेल गहेरवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## प्रोफेशनल फोटोग्राफर असोसिएशनची दरवाढ



**नांदेड (प्रतिनिधी)** –वाढती महागाई, पेट्रोल-डिझेलच्या दरामध्ये झालेली वाढ, तसेच फोटोग्राफी आणि व्हीडीओग्राफीसाठी लागणाऱ्या साहित्य व उपकरणांच्या दरात झालेली मोठी वाढ यामुळे नांदेड जिल्हा फोटोग्राफर असोसिएशनने सेवांच्या दरांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

नांदेड जिल्हा फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष गुणवंत पाटील हंगरगेकर यांच्या निवासस्थानी जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत व्यवसायासमोरील वाढत्या खर्चाचा आढावा घेण्यात आला. वाहतूक खर्च, कॅमेरे, लाईट्स, एडिटिंग साहित्य आणि इतर उपकरणांच्या किंमतीत झालेली वाढ लक्षात घेऊन फोटोग्राफी व व्हीडीओग्राफी सेवांचे नवे दर लागू करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

# केबल चोरी आणि घरफोडी करणारी टोळी एलसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहर व जिल्ह्यात केबल वायर आणि घरफोड्या करणारी चोरट्यांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी आपले सहकारी पोउपनि साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कारवाई करण्याचे आदेशीत केले होते.

गुरुवार, दि. १८ जून २०२६ रोजी पोउपनि साईनाथ पुयड व त्यांचे पथकातील अंमलदार हे नांदेड शहरातील आसना नदी ब्रिज परिसरात असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे त्यांनी भोकर फाटा येथील फ्रेन्ड्स मोटार गॅरेजजवळ सापळा रचून छापा मारला. या प्रकरणी आरोपी ईरन्ना गंगाधर नक्कलवाड (वय २९ वर्षे व्यवसाय भंगार वेचणे रा. नंदी नगर मुदखेड), मारोती प्रकाश जिंकलवाड (वय ३१ वर्ष व्यवसाय भंगार वेचणे रा. नंदी नगर



मुदखेड ता. मुदखेड, जि नांदेड) हे नगदी १ लाख ७५ हजार ८०० रुपयांच्या मुद्देमालासह मिळून आले. त्यांना विश्वासात घेऊन अधिक विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, त्यांच्या ईतर साथीदारांसह संगनमत करुन जांभळी व रिठा शिवारातून सोलार कंपनीचे सोलार प्लेटस जोडलेली वायर आणि उमरी अब्दुलापूर वाडी शिवार येथून इलेक्ट्रीक केबलची चोरी केली.

तसेच हिमायतनगर येथील एका हॉटेलचे शटर तोडून काउंटरमध्ये ठेवलेले नगदी ५० हजार रुपये आणि एका घरातील लग्नाचे कपडे चोरून त्याव्दारे आलेले पैसे सर्वांनी मिळून आपसात वाटून घेतले, असे सांगून वरील सर्व गुन्हे संगनमताने केल्याची कबुली दिल्याने नमूद आरोपीतांना मुद्देमालासह पोलीस स्टेशन भोकर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com